# माणूस

शनिवार । २१ ऑक्टोबर १९७८
७५ पैसे

" अशा वर्णनांनी भरलेले हे 'कैलासमानससरोवरदर्शन' वाचताना (पहाताना) राहून राहून एक मनात येते ते असे की, ह्या वर्णनामध्ये विलक्षण सौम्यपणा आहे. हंसस्वामींची स्थितप्रज्ञ पण स्निग्ध अशी वृत्तीच ह्या वर्णनात प्रकट झाली आहे. गोडसे भटजी हे लेखक नव्हते–हंसस्वामीसुद्धा लेखक नव्हते; पण दोघेही आपापल्या विलक्षण अनुभवांशी समरस, तादात्म्य पावूनही त्या अनुभवांना दूरवरून न्याहाळीत आहेत-– कुतूहलाने आणि तटस्थपणानेही–ह्या वैशिष्ट्याचा प्रत्यय आपल्याला येत राहतो. "

" असा प्रत्यय आला तरच साधे प्रवासवर्णनही एक उत्तम ललित वाङ्मयीन कृती ठरू शकते. "

अशा एका कृतीची ओळख....

## हंसांचे 'कैलासमानससरोवरदर्शन'
## गेल्या शतकातील एक अनोखे प्रवासवर्णन

लेखक : चंद्रकांत वर्तक

# माणूस दिवाळी अंक



**या अंकी शिवाय**

- ☐ वि. ग. कानिटकर यांची गणपतराव जोशी या नटश्रेष्ठाच्या जीवनावरील चरित्रकथा
- ☐ दि. बा. मोकाशी, छाया दातार... दोन निवडक लघुकथा
- ☐ बालगंधर्व–गोहरजान यांच्या संबंधावर नवा प्रकाश टाकणाऱ्या तीन स्फोटक मुलाखती

**यापुढील विशेषांक माणूस दिवाळी अंक**
**किंमत ७ रुपये : दिवाळीपूर्वी प्रसिद्ध होत आहे.**

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक एकविसावा

२१ ऑक्टोबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# सगळे लक्ष चिकमंगळूरकडे

सध्या साऱ्या देशाचे लक्ष चिकमंगळूरकडे लागलेले आहे. कर्नाटकातील हा जिल्हा एकदम प्रकाशझोतात आला तो इंदिरा गांधी तेथून लोकसभेची पोटनिवडणूक लढवीत आहेत म्हणून. या पोटनिवडणुकीत सव्वीस अपक्ष उमेदवारांनी भाऊगर्दी केलेली असली तरी जनता पक्षाचे वीरेंद्र पाटील आणि इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांच्यातच ही निर्णायक झुंज होणार आहे आणि म्हणूनच या दोन्ही पक्षांच्या दृष्टीने आणि विशेषत: जनता पक्षाच्या दृष्टीने या सामन्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

गेल्या वर्षीच्या मार्चमधील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभूत झाल्यानंतर त्या आकस्मिक आणि अनपेक्षित धक्क्यामुळे इंदिरा गांधी इतक्या हादरल्या होत्या की, आपण काही काळ तरी प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राहाणार आहोत असे त्यांनी त्या वेळी जाहीर केले होते. गेल्या वर्षीच्या जूनमधील उत्तर भारतातील विधानसभांच्या निवडणुकीच्या वेळी त्या खरोखरच अलिप्त राहिल्या होत्या; परंतु त्यांचे हे वैराग्य अल्पकालिकच ठरले ! कधी स्थूलात तर कधी सूक्ष्मात असलेल्या आचार्य विनोबाजींचा आशीर्वाद घेऊन त्यांनी पुन्हा राजकारणात प्रवेश केला. दुय्यद स्थान स्वीकारणे त्यांच्या स्वभावातच नसल्यामुळे त्यांनी ब्रह्मानंद रेड्डी–यशवंतराव चव्हाण यांच्या तकलादू नेतृत्वावर प्रहार केला आणि आपला स्वत:चा वेगळा पक्ष स्थापन केला. गेल्या मार्चमध्ये महाराष्ट्र कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि आसाम या राज्यांतील विधानसभांच्या निवडणुका झाल्यानंतर, आपला पक्ष हाच खरा काँग्रेस पक्ष आहे हा दावा इंदिरा गांधींनी खरा करून दाखविला. त्यानंतर स्वर्णसिंग काँग्रेस आपले वेगळे अस्तित्व कसेबसे टिकवून धरीत असली तरी तिच्यातील जोम केव्हाच नाहीसा झालेला आहे. मार्चपासून जुलैपर्यंतच्या महाराष्ट्रातील घटना पाहिल्यानंतर स्वर्णसिंग काँग्रेस केवढ्या हास्यास्पद अवस्थेला येऊन ठेपली आहे याचा साक्षात पुरावाच मिळतो.

### जनता–कलहाचा लाभ

इंदिरा गांधींनी राजकारणात पुनरागमन केल्यापासून त्या जनता पक्षाविरुद्ध धादांत खोटा प्रचार करीत असल्या तरी त्यांच्या पहिल्या आघाताचे लक्ष स्वर्णसिंग काँग्रेस हेच होते. मार्चमधल्या विधानसभांच्या निवडणुकीने ते कार्य पार पाडल्यानंतरच इंदिरा गांधींनी आपला मोहरा जनता पक्षाकडे वळविला असून त्या पक्षातील अंतर्गत कहलाचा जितका घेता येईल तेवढा लाभ घ्यायचा हे त्यांचे सध्याचे उद्दिष्ट झालेले आहे. वस्तुत: आपण लोकसभेची पोटनिवडणूक लढविणार नाही असे त्यांनी गेल्या वर्षी जाहीर केले होते. त्यात वैराग्यापेक्षा धूर्ततेचाच भाग अधिक होता. पोटनिवडणुकीत आपल्याला अपयश पत्करावे लागले तर पुढची वाटचाल करणे आपल्याला अशक्य ठरले नाही तरी निश्चितच कठीण जाईल हे माहीत असल्यामुळेच त्यांनी पोटनिवडणुकीपासून अलिप्त राहायची घोषणा केली होती. पण वर्षभरात परिस्थिती इतकी बदलली की, आपण १९८२ पर्यंत वाट पाहण्याचे कारण नाही, या निर्णयाप्रत त्या येऊन पोहोचल्या. आपल्या पक्षाच्या संसदीय विभागाचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले तेव्हाच लोकसभेत प्रवेश करण्याचा त्यांचा मानस स्पष्ट झाला होता. लोकसभा किंवा

राज्यसभा यांचा सदस्य असलेली व्यक्तीच संसदीय विभागाच्या प्रमुखपदी विराजमान होते हा आजवरचा संकेत धुडकावून देऊन इंदिरा गांधींनी ते पद स्वीकारले तेव्हाच केवळ पक्षाध्यक्षपदावर त्यांचे समाधान होण्यासारखे नाही याचा सुगावा लागलेला होता. अकरा वर्षे पंतप्रधानपदावर राहूनही ससदपटू हा लौकिक इंदिरा गांधींना संपादन करता आलेला नाही. चर्चा–प्रतिचर्चेचा संसदीय मार्ग त्यांच्या एककल्ली वृत्तीला मानवणारा नाही. सत्तेच्या चतकोर तुकड्यासाठी लाचार होणाऱ्या होयबांना हाताशी धरून कारस्थाने करण्यातच त्यांची पंतप्रधानपदाची कारकीर्द खर्ची पडली.

त्यामुळे स्वभावतः इंदिरा गांधींना लोकसभेत येऊन विरोधी पक्ष नेत्याचे जबाबदारपद झेपण्यासारखे नाही. तरीही त्या लोकसभेत प्रविष्ट होण्याची आकांक्षा बाळगून आहेत याचे कारण त्यांनी अलीकडे जो पवित्रा घेतला आहे त्यात सापडते. इंदिरा गांधींच्या आणीबाणीतील उन्मत्त हुकूमशाहीच्या पार्श्वभूमीवर जनता पक्षाची लोकशाही विशेषच उठून दिसते. इंदिरा गांधींना नेमके खटकत आहे ते हेच. त्या तोंडाने लोकशाहीचा ( आणि त्याचबरोबर समाजवादाचा ) जप करीत असल्या तरी आपल्यासारख्या खंबीर आणि कणखर व्यक्तीच्या आदेशानुसार सारा कारभार चालला पाहिजे असे त्या मानतात. लोकशाही ही त्यांच्या दृष्टीने भारतासारख्या विशाल आणि विकसनशील देशाला न परवडणारी बाब आहे. म्हणून आणीबाणीमध्ये नागरी स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला असताना ‘स्वातंत्र्य ! कुणाचं स्वातंत्र्य ?’ असला उर्मट सवाल त्यांनी केला होता. आजही त्यांच्या या विचारधारेत बदल झालेला नाही. लोकशाही येथे यशस्वी होणार नाही हे दाखवून देण्यासाठी त्यांनी निदर्शनांचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. पैसे देऊन भाडोत्री माणसे जमविणे त्यांना मुळीच त्रासदायक जात नाही. पूर्वी हे काम इंद्रकुमार गुजराल आणि ओम मेहता करीत असत. सध्या ती जबाबदारी यशपाल कपूर आणि राजेंद्रकुमार धवन यांनी पत्करलेली आहे. किसान संघर्ष समितीच्या नावाखाली पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या निवासस्थानापाशी अलीकडे जे मोर्चे काढण्यात येत आहेत त्याची सारी सूत्रे १२ विलिंग्डन क्रिसेंट येथूनच हाताळण्यात येतात. या असल्या गुंडगिरीमुळे लोकात भीतीचे वातावरण निर्माण करून शासनयंत्रणेसंबंधी अविश्वास निर्माण करण्याचा आपला प्रयत्न यशस्वी झाला तर माफक सुरक्षिततेसाठी लोक इंदिरागांधींची हुकूमशाही परवडली असे म्हणायला तयार होतील या विचारातून ही निदर्शने आयोजित केली जात आहेत. लोकांच्या मनातील भयगंडावरच हुकूमशहा स्वार होत असतो. संसदेत गेल्यानंतर तेथेही सरकारपक्षाला कामकाज सुरळीत चालू ठेवणे अशक्य करून सोडावे आणि त्यायोगे संसदीय प्रणालीवरील लोकांचा विश्वास डळमळीत करावा हाच इंदिरा गांधींचा मनसुबा असल्यामुळे त्यांना लोकसभेत जायचे आहे.

## उत्तर–प्रदेशाऐवजी कर्नाटक

त्यासाठी त्यांनी उत्तरप्रदेशातील एखादी पोटनिवडणूक लढविली असती तर त्यांनी आपला आंतरिक विश्वास पुन्हा संपादन केला आहे, असे दिसले असते; परंतु अपयशाचा किंचितही संभव पत्करायचा नाही असे त्यांनी ठरविलेले असल्यामुळे देवराज अर्स यांच्या मेहेरबानीचा स्वीकार करायला त्या राजी झालेल्या आहेत. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या दोन राज्यात इंदिरा काँग्रेसचो मंत्रिमंडळे अधिकारावर असल्यामुळे आज तरी इंदिरा गांधींना डॉ. चेन्ना रेड्डी आणि देवराज अर्स यांना झटकून टाकता येणार नाही. किंबहुना त्या दोघांच्या आग्रहापायीच त्यांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला आहे. चिकमंगळूर येथील निवडणुकीत कर्नाटक सरकारची सारी यंत्रणा इंदिरा गांधींच्या दिमतीला आलेली आहे. अर्थात एवढ्यावरून त्या विजयी होतील असा हमखास अदाज व्यक्त करता येणार नाही. कारण चिकमंगळूर येथील मतदारांचा विचार केला तर त्यांना वीरेंद्र पाटील अधिक जवळचे वाटतील. एक कर्तबगार मुख्यमंत्री म्हणून ते कन्नड जनतेला परिचित आहेत. इंदिरा गांधींच्या उमदवारीचा सुगावा लागताच, जनता पक्षाने वीरेंद्र पाटील यांची उमेदवारी जाहीर केली असती तर प्रचारमोहीम सुरू करण्याच्या बाबतीत प्रारंभी जो उशीर झाला तो टाळता आला असता.

स्वर्णसिंग काँग्रेसने या निवडणुकीसाठी आपला उमेदवार उभा न करण्याचे ठरवून आपली नामुष्को थोपविली आहे. उत्तर भारतातील लोकसभेच्या पोटनिवडणुकींनी या पक्षाचा पुरा बोजवारा उडविला होता त्यामुळे पुन्हा एकदा आपली फजिती होऊ नये या सावध विचारातूनच स्वर्णसिंग काँग्रेसची तटस्थता जन्माला आलेली आहे. स्वर्णसिंग काँग्रेसप्रमाणे उजव्या कम्युनिस्ट पक्षाचीही गेल्या वर्षभरात बरीच फरफट झालेली आहे इंदिरा गांधींना विरोध करायचा की नाही याबाबतीत उजव्या कम्युनिस्टांना अजून निर्णय करता येत नाही यावरून हा पक्ष अजूनही अधांतरी अवस्थेत वावरत आहे हेच दिसून येते. एका परकीय देशाच्या इशाऱ्यानुसार नाचणाऱ्या पक्षाला, कोठेच कसा पायरोवा करता येत नाही याचे उत्तम उदाहरण म्हणून उजव्या कम्यनिस्ट पक्षाचा निर्देश होतो.

इंदिरा गांधी निवडून आल्या म्हणजे एकदम त्यांना भलते बळ प्राप्त होणार आहे असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. शहा आयोगाने आपल्या अहवालामध्ये इंदिरा गांधींच्या वर्तनाबाबत जे निष्कर्ष पुराव्यानिशी सादर केले आहेत त्या आधारे त्यांच्यावर लवकरच न्यायालयीन कारवाईला सुरुवात होईल. एक खाजगी व्यक्ती म्हणून न्यायासनासमोर उभे राहण्यापेक्षा संसदसदस्य म्हणून उभे राहण्याने आपल्याला थोडेसे तरी संरक्षण मिळेल, या हेतूनेच इंदिरा गांधी यांना लोकसभेत यायची घाई झालेली आहे. इंदिरा गांधींच्या सगळ्या घोषणा आणि डावपेच स्वतःच्या सोयी–गैरसोयींतून आकाराला येत असतात. अशा कारवायांना मर्यादित यश येत असले तरी त्या नेहमीच यशस्वी होत राहतील असे नव्हे. म्हणून इंदिरा गांधींना चिकमंगळूर येथल्या निवडणुकीत विजय मिळाला तर घाबरून जाण्याचे मुळीच कारण नाही; परंतु कशाचाच विधिनिषेध नसलेल्या व्यक्तीला यश लाभले की तिचा उपद्रव वाढू शकतो हे लक्षात घेऊन लोकशाहीसंबंधी आस्था बाळगणाऱ्या मतदारांनी इंदिरा गांधींचा पराभव करणे हेच त्यांचे कर्तव्य ठरते. आणीबाणीमधील अत्याचारांची झळ दक्षिण भारताला सहन करावी लागली नव्हती. त्यामुळे तो आधार घेऊन जनता पक्षाला इंदिरा गांधींशी मुकाबला करता येणार नाही. गेल्या दोन–चार महिन्यांतील अंतर्गत भांडणांमुळे जनता पक्षाची पहिली प्रतिमा आता उरलेली नाही. मधु लिमये यांच्यासारख्या सरचिटणिसाला तर मोरारजी देसाई यांचे आसन अस्थिर कसे होईल याचीच अधिक चिंता लागलेली दिसते. पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांना संसदीय पक्षाच्या बैठकीला हजर राहण्याचीही गरज वाटत नाही. अशा परिस्थितीमध्ये चिकमंगळूर येथल्या प्रचारमोहिमेची जबाबदारी मुख्यतः जॉर्ज फर्नांडिस यांनाच पार पाडावयाची आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि द्रविड मुन्नेत्र कळघम यांनी वीरेंद्र पाटील यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे चिकमंगळूरमधील चहा–कॉफीच्या मळ्यात काम करणाऱ्या तामीळ आणि केरळीय कामगारांची मते वीरेंद्र पाटील यांना मिळण्याचा संभव वाढलेला आहे. मतपेटीच्या कौलासंबंधी अगोदर अंदाज बांधणे धोक्याचे ठरते, म्हणून ७ नोव्हेंबरच्या संध्याकाळपर्यंत थांबणे भाग आहे.

☐

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

## □ ज्यांचे आहे प्राक्तन शापित....

"माझा असा दृढ विश्वास आहे की, अस्पृश्यतेचा जर खरोखरच समळ नायनाट करता आला, तर हिंदु धर्मावरचा एक भीषण कलंक तर धुऊन निघेलच; पण त्याहीपेक्षा व्यापक असे त्याचे परिणाम होतील. अस्पृश्यतेविरुद्धचा माझा लढा हा मानवजातीतल्या सगळ्या अशुद्धाविरुद्ध, दुरिताविरुद्ध पुकारलेला संघर्ष आहे—आणि माझा हा आक्रोश एक ना एक दिवस परमेश्वराच्या सिंहासनापर्यंत निश्चितपणे पोचेल!" — माणुसकीविषयीची तळमळ आणि अंगीकृत ध्येयाबद्दलच्या आत्मविश्वासानं भारलेले हे उद्गार काढणाऱ्या गांधीजींच्या मृत्यूला तीन दशकं उलटून गेली आहेत. मध्यंतरीच्या मंदीनंतर गांधीजींच्या नावाचा चलनी भाव जनता राज्यात पुन्हा वधारतो आहे, अशा पार्श्वभूमीवर गांधीजींच्या या उपरोल्लेखित आशावादाचं आज काय झालं आहे, याचा शोध घेणं समयोचितच ठरणार नाही का? जनता सरकारच्या दीड वर्षाच्या कारकीर्दीत प्रकर्षात पृष्ठभूमीवर आलेल्या दलित समस्येचं स्वरूप संकलितरित्या स्पष्ट करायचं महत्त्वाचं काम 'इंडिया टूडे' या पाक्षिकाच्या ताज्या अंकांत करण्यांत आलेलं आहे. एका वेगळ्या संदर्भात याच सदरात या समस्येचं सूतोवाच दोन आठवड्यांपूर्वी करण्यात आलेलं होतंच.

प्रश्न असा आहे की, स्वातंत्र्योत्तर काळात राजसत्ता हाती मिळाल्यानंतरही ती सामाजिक समतानिर्मितीसाठी का वापरण्यात आली नाही? दलित वर्गाला वरवर पाहता अधिकाधिक सोयी-सवलती जाहीर केल्या जात असूनही प्रत्याक्षात दलितांची दशा प्रत्यही खालावतच जाताना दिसते, ती का? आपली हाक परमेश्वराच्या सिंहासनापर्यंतही पोचेल असा आत्मविश्वास गांधीजींना वाटत होता, त्यांच्या वारसदारांना ती हाक या देशाच्या कानाकोपऱ्यातसुद्धा पोचविण्यात यश का मिळू नये? यात कुठे चूक असलीच तर ती कुठं आहे, कुणाची आहे?

वरवर पाहता चित्र तसं फारसं निराशाजनक दिसत नाही. दलितांना—ज्यांना आता सर्वसाधारण 'अनसूचित जाती' (Scheduled Castes) म्हटलं जातं—खास हक्क दिलेले आहेत, राखीव जागा आहेत, शैक्षणिक आणि अन्य सवलती आहेत, याची जाणीवही दलित वर्गात मोठ्या प्रमाणावर आहे. डॉ एस्. एन्. दुबे या समाजशास्त्रज्ञानं नुकत्याच केलेल्या पाहणीनुसार सुमारे ६७% दलितांना आपल्याला फायदेशीर ठरणाऱ्या सरकारी योजना हक्क-सवलतींची माहिती आहे. या वर्गातून आता स्वतःचं नवं नेतृत्व आणि कर्तृत्व उदयाला येतंय—हे सगळं खरं; पण अंतरंगातली जुनी व्याधी मात्र अजून तशीच आहे, किंबहुना वाढतेच आहे. वानगीदाखल ही थोडी आकडेवारीच पहा ना:—

| सन | दलितावरील अत्याचाराचे गुन्हे |
|---|---|
| १९७३ | ६१८६ |
| १९७४ | ८८६० |
| १९७५ | ७७८१ |
| १९७६ | ५९६८ |
| १९७७ | ८८७२ |
| ऑगस्ट ७८ अखेर | ५९५२ |

(सर्व आकडेवारी अधिकृत २९ मार्च ७८ च्या संसदीय प्रश्नोत्तरातून उद्धृत.)

जनता राज्यात दलितांवरच्या अत्याचारांचं प्रमाण वाढल्याचा आरोप इंदिरा गांधी व त्यांचे 'ध्वनिक्षेपक' सतत करीत असतात आणि वरील आकडेवारीवरून त्यात अल्पांशाने का होईना पण तथ्य आहेच; पण तरीही खुद्द इंदिराजींची कारकीर्द फार सोवळी होती असं नव्हे—१९६६ ते ७६ या गेल्या दहा वर्षांत दलितांवरील अत्याचारांचे एकंदर ४०,००० प्रकार घडले. तेव्हा आज उग्रतर होत चाललेल्या या समस्येची बीजं 'त्या' प्रगतिदशकातच भक्कम रोवली गेली आहेत, हे उघड आहे १९७६ मध्ये—म्हणजे आणीबाणी ऐन भरात असताना—केवळ उत्तर प्रदेशातच—म्हणजे इंदिराबाईंच्या नजरेसमोरच—८९ हरिजनांना ठार मारण्यात आलं होतं, तीन दलितांना मध्यप्रदेशात कंठस्नान घालण्यात आलं होतं आणि देशाचा एकूण 'स्कोअर' होता १२६! आता बोला! सारांश, राजकीय हत्यार म्हणून देशातल्या आठ-सव्वाआठ कोटी दलितांना वेळोवेळी (मुख्यतः निवडणुकीच्या वेळीच!) वापरून घेणाऱ्या राजकीय पक्षांनी त्यांना ना आर्थिकदृष्ट्या सदृढ / स्वावलंबी बनविलं, ना राजकीयदृष्ट्या/सामाजिकदृष्ट्या जागृत नागरिक बनवायचा प्रयत्न केला. आता ही अत्याचारांचीच गोष्ट घेतली तरी असं दिसून येतं की राज्यकर्ता पक्ष त्यांचं स्वरूप सौम्य करून दाखविण्याच्या खटपटीत असतो तर विरोधी पक्षीयांना हे स्वरूप फुगवून सरकारचे वाभाडे काढण्याची एक नामी संधी त्यातून मिळाल्यासारखं वाटतं. मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करण्याइतकी फुरसत आहे कुणाला?—मग अत्याचारांचं स्वरूप किती का अमानुष असेना—त्या अमानुषतेचे हे दाखले पाहण्याजोगे आहेत:—हे आहे १ जानेवारी ७८ ते ३१ जुलै ७८ या सात महिन्यांच्या काळात हरिजनांवर झालेल्या अत्याचारांचं राज्यवार स्थूल विवरण:

| राज्य | बलात्कार | खून |
|---|---|---|
| १. उत्तर प्रदेश | ९४ | ८९ |
| २. मध्यप्रदेश | ६४ | ५० |
| ३. बिहार | ५८ | ४१ |
| ४ राजस्थान | ३८ | ३८ |
| ५. महाराष्ट्र | १४ | ७ |
| ६. हरियाना | ८ | ३ |
| ७ गुजरात | ६ | २५ |

| राज्य | बलात्कार | खून |
|---|---|---|
| ८. आंध्र | ५ | ३ |
| ९ केरळ | ५ | २ |
| १०. पंजाब | ४ | ५ |
| ११. ओरिसा | ४ | ५ |
| १२. कर्नाटक | २ | ३ |

( सर्व आकडेवारी अधिकृत. दाखल झालेले गुन्हेच लक्षात घेतले आहेत. ) उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि बिहार हे तीन 'राज्यकर्ते' गंगापुत्र प्रांत नेहमीप्रमाणेच आघाडीवर आहेत, तर अंत्योदय योजनेमुळे गाजून राहिलेल्या राजस्थाननं याही क्षेत्रात तशी पिछाडी पत्करलेली नाही. महाराष्ट्राचा क्रमांक पाचवा असला तरी नाराज व्हायचं कारण नाही. मराठवाड्याच्या अभिमानास्पद दंगलीच्या परिणामांची आकडेवारी इथं गृहीत धरलेली नाही. तिथली संभाव्य नुकसानी लक्षात घेता एव्हाना महाराष्ट्राचा नंबर बराच वर लागलेला असणार ! या अत्याचारांची तात्कालिक व स्थानिक कारणं वेगवेगळी भासली तरी सर्वांची पार्श्वभूमी तपासल्यानंतर या सर्व गुन्ह्यांच्या मालिकेला जोडणारं एक सूत्र डोळ्यांसमोर उभं राहतं ते असं की, दलितांची स्थिती सुधारण्याचे कोणतेही प्रयत्न सुरू झाले की त्यांची अशी अत्याचारी प्रतिक्रिया दलितेतर समाजात उमटते आणि प्रगतीच्या, सामाजिक समतेच्या आधीच वंगणाविना लटूखुटू चालणाऱ्या गाड्याला पक्की खीळ घातली जाते. याची उदाहरणं म्हणून बिहारमधलं गाजलेलं राखीव जागा-प्रकरण आणि आपल्याकडचं विद्यापीठनामांतर प्रकरण यांच्याकडे बोट दाखविता येईलच. बरं, दलितेतरांना ज्याचा तिरस्कार आणि मत्सर वाटावा, असा कोणता मोठा फायदा प्रत्यक्षात दलितांच्या हातात पडला आहे ? १९७१ च्या शिरगणतीनुसार, भारतीय लोकसंख्येच्या १५% असणाऱ्या दलितांचं प्रथम दर्जाच्या ( क्लास वन् ) अधिकारीवर्गातलं प्रमाण आहे जेमतेम ६.५%. एरवी अनुसूचित जातीतले ८२% लोक शेतमजुरी, खाणकाम, मासेमारी आणि सफाईसारख्या अत्यल्प वेतनाच्या कष्टात गुंतलेले आहेत. भूमिहीन शेतमजूर म्हणून दलितेतरांच्या दारात वेठकऱ्यांप्रमाणे राबणंच अनेकांच्या नशिबात आहे. त्यांच्या या अंधाऱ्या आयुष्यात एखादा जरी चोरटा आशेचा किरण डोकावताना दिसला, तरी तो चोरून न्यायला अनेकजण तत्पर असतात. बिहारमधल्या ससराम मतदारसंघातल्या पिपरी गावातल्या एका भूमिहीन हरिजन शेतमजूर कुटुंबाची अलीकडेच प्रकाशात आलेली कहाणी अशीच हृदयद्रावक आहे.

सरयू हा कुटुंबप्रमुख. १९७६ मध्ये त्याला पावणेदोन एकर जमीन मिळाली आणि भूमिहीन शेतमजूर न राहता तो स्वतः शेतकरी झाला तेव्हापासूनच गावच्या जमीनदारांचा रोष त्याच्यावर झाला होता. पावणेदोन एकरांची ही अतिप्रचंड मालमत्ता सोडायला सरयू दडपणानंही तयार होत नाही असं पाहिल्यानंतर जमीनदारानं २८ ऑगस्ट ७८ ला त्याला गोळीनं उडवलं ! त्याचा म्हातारा चुलता रामकृत यालाही सरयूबरोबर स्वर्गाला धाडलं आणि त्याचा तर मेल्यानंतर पुन्हा शिरच्छेदही केला ! सरयूचा ३५ वर्षांचा जन्मान्ध भाऊ सूरजबन्स– त्याची एकमेव काठी हिरावून घेतली गेली आणि तरुण विधवा इन्द्रवन्ती तीन छोट्या पोरांसह उघड्यावर पडली आहे ! – थोड्या-फार तपशिलाच्या फरकानं असेच प्रकार सर्वत्र घडल्याचं दिसून येतं– आग्रा असो की औरंगाबाद, नांदेड असो की विल्लुपुरम्. अशा प्रकरणांची कारणमीमांसा करताना बिहारचे असिस्टंट आय्. जी. पी. श्री. रामचंद्रखान म्हणतात की, जातीयवादाबरोबरच, जमिनीवरून होणारी भांडणं, सावकारीतून उद्भवणारे तंटे, वेठबिगारीच्या प्रथेतून येणारी तेढ आणि राजकीय वैमनस्य हेही घटक दलितांवरच्या अत्याचारांना जबाबदार असतात. खानसाहेबांचं म्हणणं खरं मानायला हरकत दिसत नाही; परंतु त्यांच्यासारख्या अधिकाऱ्याकडून सहज अपेक्षा असते, ती उपाययोजना सुचविण्याची आणि अंमलात आणण्याची. केवळ कारणमीमांसेची नव्हे. ते काम तर समाजशास्त्रज्ञ करीत आहेतच. 'नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाइड एकॉनॉमिक रीसर्च'चे समाजशास्त्रज्ञ डॉ. व्ही. सी. कोशी म्हणतात की, 'बिहार व गुजरातमधल्या नवनिर्माण आंदोलनामुळे व आणीबाणीनंतरच्या ऐतिहासिक निवडणुकांमुळे ग्रामीण दलितांमध्ये एक नवच राजकीय चैतन्य संचरलेलं दिसतं. आपल्या हक्कांसाठी झगडायला ते शिकताहेत. आणीबाणीत मिळालेल्या किंवा आधीच्या शेतजमिनी कसायचा प्रयत्न करताहेत आणि नेमक्या याच गोष्टी ग्रामीण भागातल्या प्रभुत्वशाली जातींच्या डोळ्यांत खुपताहेत ! ' तेव्हा कारणं ज्ञात आहेत म्हणावं, तर ती टाळण्याच्या दृष्टीनं परिणामकारक इलाज झाल्याचं दृश्य क्वचितच दिसतं. एरवी बहुधा अत्याचार घडून गेल्यानंतरच थोडी-फार हालचाल सुरू होते– किंवा होतही नाही ! अलीकडचं कंझावला–प्रकरण हे श्री. खान व डॉ. कोशी या दोघांच्याही मुद्द्यांना बळकटी आणणारंच आहे. सरकारकडून मिळालेली अत्यल्प जमीन कसण्याचा प्रयत्न करणारे दलित आणि त्यांची ही 'उन्नती' सहन न होणारे गावदादा जाट यांच्यातच तिथं संघर्षाची ठिणगी उडाली आहे. चरणसिंग–राजनारायण गटाचा संकल्पित 'किसान मेळावा' हाही हरियाना-बिहार-उत्तर प्रदेश या त्यांच्या प्रभावक्षेत्रातील राज्यात, दलित शेतमजूर विरुद्ध सवर्ण शेतकरी असं तणावात्मक ध्रुवीकरण घडवून आणायला कारणीभूत ठरणार आहे.

अर्थात जिथे शारीरिक अत्याचार होत नाहीत, तिथं दलितांचं पददलितपण नाहीसं झालं आहे, असं थोडंच आहे ? नोकरी-धंद्याचीच गोष्ट घ्या. दलितांसाठी सरकारी–निमसरकारी क्षेत्रात, सार्वजनिक उद्योगात नोकऱ्यांचा जो राखीव 'कोटा' ठेवला जातो, तो वरकरणी दलितांना न्याय देणारा असला व दलितेतरांचा मत्सराग्नी त्यामुळे सतत धुमसत राहणार असला, तरी प्रत्यक्षात हा रिझर्व्हड् कोटा क्वचितच पुरा केला जातो, हे किती जणांना माहीत असेल ? त्यासाठी 'लायक उमेदवारच उपलब्ध नसल्या'चं सोयिस्कर कारण सांगितलं जातं. तेही अगदी हास्यास्पद पातळीवर. स्वतः दलीत असणारे दिल्ली महानगर परिषदेचे जनता पक्षीय सदस्य श्री. स्वरूप राजन यांचा अनुभव असा आहे की, नवी दिल्ली महानगर पालिकेत लोअर डिव्हिजन क्लार्कच्या जागा भरतानासुद्धा वरील सबबीखाली दलितांना दूर ठेवलं जातं. केंद्रीय सचिवालयात आजही सचिवाच्या हुद्द्याचा एकही दलीत वर्गीय अधिकारी नाही. सार्वजनिक क्षेत्रातील बँका व इतर उद्योग यांमध्ये दलितांना राखीव जागा ठेवण्याचा

व्यवस्था तर अलीकडच्या काही वर्षांतच करण्यात आली आहे आणि त्याबाबतचं चित्र मात्र समाधानकारक आहे. राष्ट्रीयीकृत बँकांमधील मागासवर्गीय अधिकाऱ्यांची संख्या १९७३ अखेर फक्त ०.२% होती, तर १९८७ अखेर ती १०% झाली आहे आणि ही वाढ समाधानकारक वाटते. मात्र याच वेळी हेही लक्षात ठेवलं पाहिजे की, १९६९ पर्यंत खाजगी मालकीच्या असलेल्या या बँकांमध्ये दलित अधिकाऱ्यांचं प्रमाण नगण्यच होतं आणि आजही खाजगी मालकीच्या बँका व खाजगी क्षेत्रातील उद्योगांमधलं दलितांचं प्रमाण किरकोळच आहे.

शिक्षणक्षेत्रही या भेदभावापासून अलिप्त नाही. दोनच महिन्यांपूर्वी निराश, खचलेल्या अवस्थेत मरण पावलेले संस्कृतचे पंडित डॉ. राम शरण शास्त्री यांचं उदाहरण याबाबतीत पुरेसं होईल. या मागासवर्गीय विद्यार्थ्यानं वाराणसीच्या डॉ संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालयातून संस्कृतमधील डॉक्टरेट संपादन केली आणि दिल्ली विद्यापीठात रीसर्च स्कॉलर म्हणून ते काम करीत होते. तथापि प्राध्यापकाची नोकरी मिळविण्यात त्यांना संपूर्ण अपयश आलं. एका दलित विद्यार्थ्यानं धर्माची, धर्मग्रंथांची आणि उच्चवर्णीयांची मिरासदारी असणारी भाषा शिकून वर शिकवायची मनीषा धरावी, हे महापाप अर्थातच आपल्या पूज्य पुरातन संस्कृतीच्या चौकटीत बसण्यासारखं नव्हतं.

अधिकार नसताना तपश्चर्या केल्याबद्दल प्रभु रामचंद्रानं शंबूक नावाच्या शूद्राचा वध केला होता, अशी कथा आहे. कै. राम शरण शास्त्रींना आता त्यांचे मित्र 'दिल्लीचा शंबूक' असंच म्हणतात !

—आणि ज्या राखीव नोकऱ्यांच्या प्रश्नांवरून वारंवार वादळं उठताहेत त्याबाबतची ही संख्याशास्त्रीय वस्तुस्थिती, एकदा नजरेखाली घालायला हवी अशीच आहे. दलितांसाठी—अनुसूचित जातींसाठी—राखून ठेवण्यात आलेल्या जागांचं प्रमाण आणि त्यापैकी प्रत्यक्षात भरल्या गेलेल्या जागांचं प्रमाण यांची राज्यवार तुलना करून पाहणं उद्बोधक ठरेल—

| राज्य | राखीव जागा (%) (Class I अधिकारी फक्त) | प्रत्यक्षात भरलेल्या जागा (%) (Class I अधिकारी फक्त) |
|---|---|---|
| आंध्र | १४ | ५.५० |
| गुजरात | ५ | १.७५ |
| हरियाना | २० | ३.७५ |
| कर्नाटक | १५ | ४.२५ |
| केरळ | ८ | २.०० |
| मध्य प्रदेश | १५ | २.०० |
| महाराष्ट्र | १३ | ३.०० |
| ओरिसा | १६ | १.०० |
| पंजाब | २० | ६.०० |
| राजस्थान | १६ | ३.२५ |
| तामिळनाडू | १६ | ४.०० |
| उत्तर प्रदेश | १८ | ३.०० |
| पश्चिम बंगाल | १५ | २.२५ |
| हिमाचल प्रदेश | २२.५० | १.७५ |
| दिल्ली व | १५ | ३.०० |
| पाँडिचरी | १६ | १.०० |

शारीरिक अत्याचार व आर्थिक दुरवस्था एवढ्यावरच मागासवर्गाचे प्रश्न संपत नाहीत. सामाजिक न्यायाचा, सांस्कृतिक दर्जाचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. ज्या ठिकाणी त्यांना मानानं वागवलं जात नाही, तिथं त्यांना समानतेच्या दर्जानं वागवलं, जातंच असंही नाही. याचो उदाहरण 'एक गाव एक पाणवठ्याच्या' चळवळीशी परिचित असलेल्यांना नव्यानं द्यायला नकोत. हे सगळं असं का घडतंय याची सविस्तर कारणमीमांसा करायचं हे ठिकाण नव्हे; परंतु सूत्ररूपानं एवढं म्हणता येईल की, अगदी गांधीजींच्या काळापासूनच मागासवर्गीयांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक न्याय मिळवून देण्यासाठी ज्या ज्या चळवळी झाल्या, त्यांना नेमकी दिशा आणि नेमका रस्ता, दोन्हीही सापडू शकल नाही आणि म्हणून एकांड्या चळवळी झाल्या आणि थंडावल्या. सगळ्या पददलितांचे हितसंबंध शेवटी एकच आहेत आणि ते माणुसकीविरुद्ध अमानुषता या व्यापक संघर्षाशी सबद्ध आहेत, हे सत्य समजून घेऊन व पायाभूत मानून संघर्ष झाल्याचं क्वचितच आढळतं. देशव्यापी संघर्ष झाले ते फक्त गांधीजी आणि डॉ. आंबेडकरांच्या हयातीत, बहुंशी स्वातंत्र्यपूर्वकाळातच. त्यातूनही सामाजिक न्यायाची जी चळवळ गांधीजींनी उभारण्याचा प्रयत्न केला तिचा आशय त्यांनी मूलत: भावनात्मक, क्वचित व्यक्तिगतसुद्धा—ठेवला. त्यामुळे त्या एका व्यक्तीच्या मृत्यूबरोबरच तिचं आवाहनही लोप पावलं. डॉ आंबेडकरांनी संघटित केलेलं आंदोलन हा आशेचा किरण वाटत असतानाच त्यांनी काहीशा अनपेक्षितपणे त्यावर धार्मिक उपाययोजनेचा ( religious solution ) पर्याय काढून, आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा मान राखला; परंतु त्यामुळे मूळ प्रश्नाच्या सोडवणुकीचा प्रयत्न थांबला. हिंदू मागासवर्गीय असतानाच्या या समाजघटकाच्या कोणत्या समस्या नवबौद्ध झाल्यानंतर सुकर झाल्या, याची तपासणी होणं आणि त्या दृष्टीनं डॉ. आंबेडकरांच्या धर्मान्तराच्या त्या ऐतिहासिक निर्णयाची वस्तुनिष्ठ चिकित्सा होणं जरुरीचं आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वस्तुत: या प्रश्नावर अधिक लक्ष केंद्रित व्हायला हवं होतं, कारण एक तर सरकार आपलं होतं आणि शिवाय राजकीय स्वातंत्र्यासारखा राष्ट्रीय विस्ताराचा प्रश्न सुटला होता. तथापि नेमकी याच काळात – विशेषत: डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर – मागासवर्गीची फळी फुटली, नव्या नेतृत्वाला एकजूट व प्रखरता टिकविता आली नाही आणि पुराणमतवाद्यांनी। संधिसाधूंनी। जमीनदारांनी उचल खाल्ली, ती थेट आजपर्यंत. जन्मल्यानंतर लगेचच दुफळीनं पोखरलेले दलित पँथर्स, सिंहासनावरील मांड पक्की झालेल्या हितसंबंधियाविरुद्ध कसे दुबळे ठरले तो अनुभवही महाराष्ट्राला नवा नाही. मागासवर्गीयांपैकीही ज्यांचे आर्थिक प्रश्न सुटले, ते 'आहे रें'च्या वर्गात सामील होऊन पाहतापाहता प्रवाहपतित – अदृश्य कसे झाले, हेही आपण पाहिलं आहे. अशा स्थितीत एकीकडे बी. पी. मौर्य ( एक प्रमुख दलित-नेते. पूर्वीचे केंद्रीय राज्यमंत्री, आता इंदिरावासी ) किंवा भोला पास्वान शास्त्री ( बिहारचे माजी मुख्यमंत्री, राज्यसभेतील काँग्रेस पक्ष-

पृष्ठ १४ वर

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरंदरे

# पाकिस्तान

## भुट्टो ते पैगंबर, व्हाया मिलिटरी

तीस तीस वर्षे लोटूनही एखाद्या देशाची घडी नीट बसू नये हा दुर्दैवाचाच भाग म्हणावा लागेल. फार मोठे प्रश्न, मोठी परकीय आक्रमणे वगैरे झाली तर एक वेळ काही सबब तरी मिळते; पण केवळ नालायक नेत्यांमुळे सामान्य माणसाचे हाल व्हावेत आणि थोड्या-फार खंडाने सतत लष्करी राजवट नशिबी यावी, हे पाकिस्तानचे ग्रहमान विचित्रच दिसते !

दैवदुर्विलास असा की, ज्या वेळी अत्यंत नाजूक परिस्थिती त्या देशात निर्माण होते, तेव्हाच नेमका अदूरदर्शी सर्वेसर्वा बिसाडघाईने निर्णय घेऊन परिस्थितीचा विचका करून टाकतो.

परवाच पाकिस्तानात मतदानाविषयीचा एक मूर्ख कायदा रूढ करण्यात आला. 'महंमद पैगंबर हाच शेवटचा प्रेषित होता आणि त्याच्या दैवी शक्तीवर माझा व माझ्या कुटुंबियांचा पूर्ण विश्वास आहे', अशी शपथ घेणाऱ्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांनाच फक्त मतदानाचा हक्क राहील! मुळात हे मतदान करण्याची संधी पाकिस्तानी नागरिकांना केव्हा मिळणार आहे हा सस्पेन्सच आहे. ऑक्टोबर १९७९ हे झिया उल् हकने दिलेले ताजे आश्वासन आहे; पण त्यावर विश्वास ठेवण्याचे काहीच कारण नाही.

या कायद्यातूनही दूरगामी परिणाम करणारा एक कायदा तत्पूर्वीच लागू करण्यात आला. त्याअन्वये मुस्लिम मतदार व मुस्लिमेतर मतदार यांच्यासाठी निराळे मतदारसंघ तयार करण्यात येतील. यावरून पाकिस्तानच्या नेतृत्वाचे आपण विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगत आहोत याचे भान सुटले असावे असेच वाटावे. मुळात पाकिस्तानच्या अन्तर्गत असंतोषाचे हे दृश्य परिणाम आहेत हे उघड आहे.

जनाब भुट्टोंच्या तथाकथित सुधारक धोरणांकडून एकदम अबाउट टर्न केल्याने प्रत्यक्ष जनतेला ते कितपत मानवेल याचा, किंवा जनतेला आवश्यक व हितकर काय याचा विचार राज्यकर्त्यांना शिवलेला नाही. भुट्टोच्या कारकीर्दीत पुराणमतवादी मुस्लिम दुखावले गेले. जमायत इस्लामी ही कडव्या मुसलमानांची संघटना. वस्तुतः शहरी मध्यमवर्ग हा एतद्देशीयांप्रमाणेच धर्माच्या रूढ अर्थातून व स्वरूपातून बाहेर पडत होता. इस्लामच्या नावाखाली दिल्याखेरीज सुधारणांची गोळी गिळली जात नाही हे लक्षात आल्यावर भुट्टोने तेही केले; पण त्याचा मूळचा उद्दाम स्वभाव, अप्रामाणिकपणा, हुकूमशाही वृत्ती हे अवगुणही तितक्याच तोलामोलाचे असल्याने त्याला कैदेत पडावे लागले.

### भुट्टो आणि इराणचा शहा

भुट्टो निवडणुकीच्या सर्वश्रुत गोंधळाने पदच्युत झाला; पण ते निमित्त होते. वर सांगितल्याप्रमाणे मुल्लामौलवींचा अंधश्रद्ध-दृष्टिकोन हे त्याचे प्रमुख कारण होते. इराणच्या शहाशी त्याची या बाबतीत तुलना योग्य ठरेल. अर्थात इराणच्या शहाला भुट्टोच्या मानाने कारकीर्द बरीच मोठी लाभली; पण त्याच्याही मयूरसिंहासनाला आता असंतोषाची आग लागतेच आहे. याचे कारण असे की, आज-काल असा एक हुकूमशहांचा नवा वर्ग अस्तित्वात आलेला दिसतो की जो बुद्धिमान आहे, वागणुकीत प्रागतिक आहे; परंतु माझे सत्य हेच अंतिम सत्य हा प्रत्येक हुकूमशहाचा दावा त्याचाही असतोच. त्याहूनही राष्ट्रजीवनाला बाधक अशी बाब म्हणजे स्वतःच्या कुटुंबातील घटकांना वारस नेमण्याचा अशांचा अट्टाहास!

भुट्टो जोपर्यंत लोकांच्या स्मरणात आहे तोपर्यंत तो झिया उल हकची प्रमुख डोकेदुखी आहे; मग तो तुरुंगात असो किंवा मुक्त असो. राजकीय पक्षांना जरा मोकळीक देताच भुट्टोची पीपल्स पार्टी तावडतोब कामाला लागली. रावळपिंडीमध्ये प्रचंड प्रमाणात निदर्शने झाली. लाहोर आणि मुलतानमध्येही पीपल्स पार्टीचे कार्यकर्ते आणि सशस्त्र पोलीस दल यांच्यात मोठ्या प्रमाणात चकमकी उडाल्याच्या बातम्या आहेत. मुस्लिम लॉ सध्या जोरात लागू असल्याने त्याखाली सार्वजनिक जागी फटके मारण्यासारखे उपक्रम सरकार उत्साहाने पार पाडते. भुट्टोच्या बाजूने निदर्शने करणाऱ्या अशा आठ जणांना ७ ऑक्टोबरला असेच फटके मारण्यात आले. पाकिस्तानच्या सरहद्दीवरचे प्रांत प्रथमपासूनच अस्वस्थ असतात. त्यात भुट्टोच्या कन्यकेने दौरा काढला आणि ते पेटायला अवकाश लागणार नाही असे लक्षात आले. या दरम्यानच फाजल चौधरी या पाकिस्तानच्या आजवर नामधारीच असणाऱ्या अध्यक्षाने राजीनामा दिला आणि लोकशाहीचा शेवटचा धागा तुटला.

### खरे दुखणे

पाकिस्तानच्या राजकीय पटावरची ही अस्वस्थता निर्माण होण्याचे खरे कारण लायक व प्रामाणिक नेतृत्व निर्माणच झालेले दिसत नाही. आज पाकिस्तानचा गाडा हाकू शकतील अशा योग्यतेच्या तीनच व्यक्ती आहेत. त्या म्हणजे भुट्टो, एअर चीफ मार्शल असगरखान आणि खान अब्दुल वलीखान झिया उल् हक स्वतःच ओढवून घेतलेल्या जाळ्यात इतका गुरफटला आहे की तो सहीसलामत दूरच, सरळ तरी बाहेर पडेल की नाही याची शंका आहे.

### भुट्टो

भुट्टोच्याबाबत लोकांची दोन टोकांची मते आहेत. थोड्या-फार प्रमाणात इंदिरा गांधींसारखीच त्याची प्रतिमा आहे. या दोघांबद्दलही सगळ्यात मोठ्या प्रमाणावर व शत्रूंच्यात आणि मित्रांच्यात रूढ झालेला गैरसमज म्हणजे त्यांची क्षमता

जबरदस्त आहे. वैयक्तिक स्वार्थ आणि भोंदूपणा यांचे मिश्रण असणाऱ्या या व्यक्तीं-विषयी एक विकृत आकर्षण त्यामुळे आजही बुद्धिवंतांच्यात आढळून येते; परंतु दुसऱ्या टोकाचे लोक काहीही करून भुट्टोचे राजकीय जीवन संपुष्टात आणण्याच्या बाजूचे आहेत. यात कट्टर मुस्लिम संघटनेचे अनुयायी येतात; परंतु भुट्टोला वगळणे याचा अर्थ पाकिस्तानची चक्रे काळाच्या उलटया दिशेला फिरविणे नव्हे. झिया उल् हकने मुस्लिम धर्माचा पुळका आल्याचा जो डोलारा प्रामाणिकपणे उभा केला आहे, त्यामध्ये केवळ या धर्मपिसाट लोकांचा पाठिंबा मिळविणे एवढाच हेतू आहे; पण त्यामुळे तो लोकांच्या होता तेवढाही जवळ राहिलेला नाही.

## अशगरखान

एअर चीफ मार्शल अशगरखानबद्दल मत फारसे वाईट नाही; परंतु त्याचा सर्वांत मोठा तोटा म्हणजे तो लष्करचा माणूस आहे. लष्करी राजवटीचा भरपूर अनुभव गाठीशी असल्याने आणखी थोडी चव घेण्याची जनतेची अजिबात इच्छा नाही. अशगरखानने आपली ही प्रतिमा बदलण्याचा बराच प्रयत्न केलेला आहे; परंतु तो खऱ्या अर्थाने लोकनेता होणे कठीण आहे. शिवाय त्याला मिलिटरीतलाही पाठिंबा कितपत आहे याची रास्त शंका घेण्यास जागा आहे. कारण झिया उल् हक इतका काळ जो जागेवर आहे तो केवळ मिलिटरीच्याच पाठिंब्यावर.

## वलीखान

खान अब्दुल वलीखान हाच आपला खरा शत्रू असल्याचे भुट्टोने सुरुवातीपासूनच ओळखले होते. त्याला तुरुंगातच बहुतेक काळ खितपत ठेवून भुट्टोने त्याचे राजकीय आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला; पण बेगम वलीखान हीही कर्तृत्ववान स्त्री निघाली ! वलीखानचा लोकांच्यात शिरकाव चांगला झालेला आहे; परंतु मिलिटरीचे राज्य येताच त्यांनी भुट्टो झाला, या आनंदात मिलिटरीची वारेमाप स्तुती केली; पण मिलिटरीने शोभेशा खाकी डोक्याने धार्मिक निर्णय घेतल्यावर त्याचे समर्थन करणे किंवा न करणे दोनही पर्याय त्यांच्यापुढे अडचणीचे ठरले. कारण समर्थन केल्यास आपली प्रतिमा नष्ट होते, न केल्यास मिलिटरीशी शत्रुत्व ओढवेल. यामुळे तो सध्या निष्प्रभ झाल्यात जमा आहे.

## भुट्टोची फाशी

भुट्टोची फाशी हा तर स्वतंत्रच विषय होईल. ऑक्टोबरच्या अखेरीस त्याने सुप्रीम कोर्टात केलेल्या अपिलाची सुनावणी होईल. तोपर्यंत पीपल्स पार्टी अधिकाधिक गोंधळ करून लष्कराला बदनाम करण्याची एकही संधी सोडणार नाही. तुर्कस्तान, सौदी अरेबिया, युनायटेड अरब एमिरेट्स्, इराण यांच्यातर्फे भुट्टोचे आयुष्य वाचविण्यासाठी बरेच प्रयत्न चालू आहेत. त्यात सौदी आणि इराण यांनाच पाकिस्तानच्या सरकारवर पैशाचा नळ हातात असल्याने दडपण आणता येते. त्यातही इराण स्वतःच्या दुखण्यांनी जर्जर झालेला आहे आणि सौदींना कॅम्प डेव्हिडचे यश मध्यपूर्वेत त्यांचे महत्त्व कमी करते की काय, याची ताजी चिंता लागलेली आहे.

त्यात भुट्टोने तुरुंगातूनही निवेदने काढणे वगैरे पब्लिसिटी स्टंट केलेले आहेत. आजकाल भुट्टोचे पाठिराखे उपोषणे, आत्मदहन अशा दबावाचे खेळ करीत आहेत. कारण त्यामुळे लोकांची मने चटकन् आकृष्ट करून घेता येतात.

झिया उल् हक संपूर्ण आर्थिक पुनर्रचना करणार असल्याचे वारंवार म्हणतो; परंतु त्याचा सविस्तर तपशील त्याने दिलेला नाही. निदान भुट्टोच्या अंतर्गत योजना जरी त्याने नीट राबविल्या तरी पाकिस्तानला स्थैर्य येईल.

## संभाव्य धोके

मात्र आजवर ज्या गोंधळलेल्या अवस्थेत तो वावरत आला आहे, तसाच अक्षमतेने वावरत राहिला तर त्याची उचलबांगडी दूर नाही. तोपर्यंत पाकिस्तानचे मात्र अपरिमित नुकसान झालेले असेल. लेखाच्या सुरुवातीला नमूद केलेला स्वतंत्र मतदारसंघाचा धोका निष्कारण आमंत्रण देऊन बोलाविलेला आहे. त्यामुळे १० टक्क्यांहूनही कमी असणारे अल्पसंख्यांक असुरक्षितेच्या भावनेने अधिक पछाडतील आणि नव्या प्रकारच्या आंदोलनांना जन्म मिळेल. एकदा असा पायंडा पाडला की, नंतरच्या राज्यकर्त्यांनाही ते निस्तरणे जड जाईल.

दुसरा धोका म्हणजे अस्थिर पाकिस्तान रशियाच्या पथ्यावर आहे. अमेरिका किंवा चीनशी पाकिस्तानचे पूर्वी होते तेव्हढे संबंध नाहीत. मुळात लष्करशहरावर राष्ट्रीय नेता म्हणून विश्वास टाकला जात नाही. अफगाणिस्तान रशियाने घशात घातलाच आहे आणि शेजारचा इराणही दंगलींनी पेटला आहे. अशा वेळी स्थिर व लोकनियुक्त खंबीर शासन ही पाकिस्तानची गरज आहे. पंजाब, सिंध, पख्तुनिस्तान, बलुचिस्तान यातील निरनिराळ्या कारणांस्तव होणाऱ्या गडबडी सध्या थंडावल्या असल्या तरी बंद पडल्या आहेत असे म्हणता येणार नाही. जर या साऱ्या असंतोषाचे प्रतीक जनाब भुट्टो झाले आणि भक्ष्य झिया उल् हक् आणि मिलिटरी झाले तर पाकिस्तानात यादवीच माजेल, हा तिसरा आणि सगळ्यात महत्त्वाचा धोका आहे.


राष्ट्रीय समतोल साधणारे नेतृत्व उदयास येईपर्यंत बेबंदशाहीचे पिशाच्च पाकिस्तानचे सच्चीकरण करणार, असाच आज तरी रंग दिसतो. □


**आणीबाणीच्या पावणेदोन वर्षांचा वेगळा शोध**
**स्पष्ट, परखड आणि प्रामाणिक**

# जनांचा प्रवाहो चालिला

**लेखक : विनय हर्डीकर**
**किंमत : वीस रुपये**
राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

## जोशी–अभ्यंकर हत्याकांड



# एका वार्ताहराची दैनंदिनी

### भाग चवथा । वरुण भिडे

३० ऑगस्ट १९७८ : ७५ वा दिवस

सरकारी वकिलांचे आर्ग्युमेंट चालू होते त्या आठ दिवसात आरोपी कसे ' हलकट, नालायक, पाजी, बदमाष, खुनी ' होते याचे वर्णन चालू होते. आजपासून तेच अत्यंत ' निरागस, निष्पाप, जन्मत: गळ्यात तुळशीमाळ असणारे संत होते, ' याचे पुराण चालू आहे.

एकंदर वकिलांची आर्ग्युमेंटस् म्हणजे ' कलगी–तुरा ' किंवा आंतर महाविद्यालयीन वादस्पर्धेतल्या खोटया हिरीरीने चालणाऱ्या प्रकारासारखी आहेत.

पण कोळसे पाटलांचे आर्ग्युमेंट झाले मात्र चांगले. शामरावांचे बोलणे म्हणजे पिठाची गिरणीच होती. आज बऱ्याच चांगल्या वेगाने काम संपले. एकंदर डिफेन्स स्टोरी, अटकेपूर्वीच आरोपी पोलिसांच्या ताब्यात होते, त्या काळात बनावट पुरावा केला असणे शक्य आहे, खरे आरोपी मिळत नाहीत म्हणून कोणाला तरी पुढे आणले आहे, अशीच आहे.

चांडकची साक्ष विश्वासार्ह नाही, हे सांगताना कोळसे पाटील म्हणाले, ' चांडक सांगतो त्या प्रकारे पीप सायकलवर ठेवून नेणे अशक्य आहे. आम्ही प्रयोग करून पाहिला आहे. ' ते म्हणतात ते खरे आहे. आम्हीही हा प्रयोग करून पाहिला. तशी सायकल दोनशे मीटर सुद्धा जात नाही.

जक्कलने मंगळसूत्र विकले ते त्याच्या बहिणीचे होते. हा मुद्दा मांडतांना वकील म्हणाले, ' दागिन्यांची दुरुस्ती-मोड करताना माहेरच्या सोनाराकडे काम देण्याची बायकांची प्रवृत्ती असते, ' हे खरे आहे. ' माहेरचा वैद्य — सासरचा वैद्य ' या भोंडल्याच्या गाण्यात हीच प्रवृत्ती दिसते; पण हा मुद्दा मांडताना नगरकर हा त्यांचा नेहमीचा सोनार होता असे दाखवायला हवे होते.

आणखी एक मुद्दा चांगला मांडला. ' पिपाचे तोंड नायलॉनच्या दोरीने बांधले असताना त्यातून कवटी बाहेर आलीच कशी ? कवटी पिपात सापडली नाही, याचा अर्थ बनवाबनवी असावी '.

मुद्दा चांगला आहे; पण कवटी पिपात न सापडता बाहेर सापडली याचे जे कारण कानावर आहे ते भलतेच इंटरेस्टिंग आहे. प्रकाशच्या खुनानंतर चार–पाच महिन्यांनी ही मुले पुन्हा पेशवेबागेत गेली. रात्रीच्या अंधारात पाण्यात जाऊन पिपाची दोरी सोडली. त्यातली हाडे काढून घ्यायची आणि पुरावा नष्ट करायचा असा त्यांचा बेत होता म्हणे; पण दोरी सोडली आणि आतला सांगाडा भस्कन् उभा राहिला. बहुधा सांगाड्याची पूर्ण झीज झालेली नसावी. त्यामुळे घाईने सांगाडा तसाच आत दाबला. कशी तरी दोरी बांधली आणि चौघेजण पळून गेले. त्याच गडबडीत कवटी बाहेर आली असावी.

ही गोष्ट जर खरी असेल तर या मुलांच्या हिमतीचे कौतुक केले पाहिजे. रात्रीच्या वेळी, पाण्याखाली सात–आठ फुटांवर श्वास कोंड-

लेल्या अवस्थेत असताना सांगाडा उभा राहिलेला पाहून भुताच्या कल्पनेने हार्ट फेल होऊन माणूस मरायचाच; पण तरीही प्रसंगावधान राखून सांगाडा आत दडपायचा, दोरी बांधायची सारेच विलक्षण !

पोलिसांनी या मुलांच्या जबान्या टेप केल्या आहेत असे म्हणतात. नष्ट करण्यापूर्वी टेप ऐकल्या पाहिजेत.

मला आपल्याकडच्या कायद्याची गंमत वाटते. पोलिसांपुढे दिलेल्या आरोपींच्या जबान्या पुराव्यात वापरता येत नाहीत. सांगाडा उभा राहिल्याची गंमत पुराव्यात येऊ शकत नाही. तपासाची प्रत्येक घटना पंचांसमक्ष झाली पाहिजे. गॅझेटेड ऑफिसर असणाऱ्या इन्स्पेक्टरवर कायद्याचा विश्वास नाही; पण कुठला तरी टिनपाट माणूस पंच म्हणून 'माझ्या समक्ष अमुक-तमुक झाले,' असे म्हणाला की तो लगेच स्वतंत्र पुरावा. नाही तरी सगळा पुरावा काय आपोआप मिळतो का ? आरोपी बोलत जातात आणि पोलीस वस्तू किंवा साक्षीदार शोधत जातात. आरोपी जर बेरकी आणि मार खाण्यात तरबेज असतील तर काय डोंबल पुरावा सापडणार ! पण कुठले तरी पुराणकालीन कायदे आपण अजून वापरतो आणि अनेक रंगतदार किस्से लोकांपुढे येतच नाहीत.

### ३१ ऑगस्ट १९७८ : ७६ वा दिवस

आजचे आर्ग्युमेंट बरेच इंटरेस्टिंग होते. 'बाफनांच्याकडे चोरीचा प्रयत्न झाला, हात-पाय बांधले वगैरे प्रकार खरा, कोणी तरी दोघे आले होते हे खरे; पण ते लोक म्हणजे आरोपी नव्हेत आणि बाफनामंडळी ओळखल्याचे सांगतात तेवढे खोटे.' मजा आहे.

बाफनांच्या बंगल्यात त्यांच्या दिवाणजीचे आणि राजू जैनचे हात-पाय बांधले जात होते त्या वेळी मिसेस बाफना आतल्या खोलीतून मोठ्याने म्हणाल्या, ' राजेंद्र, काय चालले आहे ? ' हे वाक्य ऐकल्यावर जक्कलची काय अवस्था झाली असेल ? तो कधी निवांत भेटला तर त्यालाच विचारायला पाहिजे. मिसेस बाफनांचे हात-पाय बांधल्यावर सुतारने जक्कलचे नाव कळू नये म्हणून 'बॉस-बॉस' अशा हाका मारल्या. त्या सहज मारलेल्या हाकेतून पुढे काय मस्त अर्थ निघत गेले ! काय कल्पनांचे इमले बांधले गेले !

बाफनांच्या बंगल्यात 'अनोळखी लोक आले,' या घटनेपासून पोलिसांना खबर देईपर्यंतची घटना एकूण अर्ध्या तासाची आहे, असे रेकॉर्ड आहे. वर्णनावरून एकंदर प्रसंग तासाभराचा वाटतो. हा मुद्दा बरोबर पकडून आर्ग्युमेंट केले. लोक बोलताना आणि पोलीस लिहून घेताना वेळेची फार ढिलाई ठेवतात. पुढे कोर्टात मिनिट-मिनिट लढवू असा प्रकार चालतो.

सराफ आणि सोनार यांच्यावरही वकिलांनी तडाखेबंद हल्ला केला. निकाल देताना 'सराफांवर कारवाई करा' अशी ऑर्डर द्यायला पाहिजे, काय मजा येईल !

### १ सप्टेंबर १९७८ : ७७ वा दिवस

कोळसे पाटलांचे आर्ग्युमेंट संपले. दोन दिवसांत बहुतेक मुद्दे बोलून संपले असल्याने फार कंटाळा आला होता. दिवसभर अस्वस्थ वाटत होते. काम संपले की, के. ई. एम्. मध्ये जाऊन साडूंची तब्येत कशी आहे हे बघून यावे, असे सारखे वाटत होते.

काम संपवून घरी गेलो तेव्हा के. ई. एम्. हॉस्पिटलमध्ये जाण्याची गरजच राहिली नव्हती असे समजले. म्हणून त्यांच्या घरी गेलो. घरी हलकल्लोळ उडाला होता. इतका बुद्धिमान, संपन्न, पगारदार मुलगा तडकाफडकी गेला. मन बधीर झाले. तिथे थांबणे असह्य झाल्याने स्मशानात जाऊन थांबावे असा विचार केला.

स्मशानात हजार-दीडहजार लोक जमले होते. अत्यंत अबोल असणारा माणूस इतका लोकप्रिय होता हे आता समजले.

तिथे पारावर एकटाच बसून राहिलो. अनेक प्रसंग डोळ्यांपुढे आले. बापू पानसे, कुंदा कुलकर्णी, मोरेश्वर चंद्रचूड यांचे अपघाती मृत्यु आठवले, बातमीदार या नात्याने मी पन्नास वेळा तरी या स्मशानात आलो होतो; पण पंधरा दिवसांपूर्वीचा अनिल टाकळकरच्या वडिलांचा मृत्यू आणि आजचा प्रसंग यामुळे फार गांगरल्यासारखे झाले.

जोशी-अभ्यंकर कुटुंबियांचे सामुदायिक दहनसुद्धा मी अत्यंत तटस्थपणे पाहिले होते; पण त्या वेळी किंवा गेल्या सत्तर-ऐंशी दिवसांत मला त्यातील दुःखाची भीषणता जाणवली नव्हती ती आज जाणवली !

मागे नात्यातल्याच एका मृत्यूचे वेळी आलो होतो. त्या वेळी पुण्यातल्या एका प्रख्यात वकिलांनी खणखणीत आवाजात 'अशोच्यानन्वशोचस्त्वं' वगैरे श्लोक म्हटले होते. पुढे त्यांच्याच हातातोंडाशी आलेला मुलगा तडकाफडकी गेला त्या वेळी त्यांना गीता आठवली असेल का, या कल्पनेने हसू येऊ लागले.

जीर्ण झालेले वस्त्र बदलावे तसा आत्मा शरीर बदलतो, ह्या गोष्टी बोलायला छान असतात; पण आत्मा आपल्या कुठे ओळखीचा असतो ? शरीरच ओळखीचे असते. ज्या दोन वस्त्रांची गाठ मारलेली असते त्या वस्त्रांचे काय ?

हेगडेचे वडील, अभ्यंकर पती-पत्नी, गोखलेचे वडील यांचे चेहेरे रिकामे रिकामे दिसतात; कुठे तरी शून्यात नजर लावून ते बसतात; याचा अर्थ आता समजला. त्यांना 'आत्मा अमर आहे,' हे शिकविले नसेल का ? पण तरी रिकामे वाटलेच ना ? असो; पण सत्याचा शोध लागायला स्मशान ही फारशी चांगली जागा नव्हे.

### २ सप्टेंबर १९७८ : ७८ वा दिवस

विजय नहारनी आज सुतारतर्फे आर्ग्युमेंट केले. चांगले बोलत होता. त्याची पर्सनॅलिटी छान आहे. अनेक वकिलांपेक्षा इंग्रजी चांगले आहे. आवाजाला वजन आहे; पण मला त्याचे आर्ग्युमेंट अपील होत नव्हते. कदाचित कालच्या घटनेचा परिणाम असेल. कदाचित तेच तेच मुद्दे असल्याने तसे वाटत असेल.

### ४ सप्टेंबर १९७८ : ७९ वा दिवस

विजयराव मोहिते सुरू झाले. ते अतिशय हळू आवाजात बोलतात. अतिशय नम्रपणे आणि सभ्यपणे बोलतात. वास्तविक त्यांच्याइतक्या अनुभवी वकिलाने इतका नम्रपणा दाखविण्याची गरज नाही; पण गंमत अशी की, त्यांच्या नम्रपणात कुठेही ढोंग, खोटेपणा वाटत नाही. त्यांचे बोलणेही अतिशय मोजक्या शब्दांत असते. कधीही अघळपघळ बोलत नाहीत, वेळ घालवीत नाहीत.

त्यांची ही बोलण्याची पद्धत त्यांना व्यावसायिक यश मिळविण्यास उपयोगी ठरली असेल; पण या खटल्यात प्रसिद्धीच्या दृष्टीने मारक ठरली आहे. निदान मी तरी त्यांना फारशी प्रसिद्धी दिलेली नाही.

व्हायचे काय, मुख्य आरोपींचे वकील कोळसे पाटील, प्रत्येक प्रकरणात त्यांचे आरोपी होतेच, शिवाय पहिली उलटतपासणी घेणाऱ्याला भरपूर स्कोप असतो. त्यामुळे त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळायची. शेवटी उलटतपासणी घेणारे नागूअण्णा देशपांडे अशी मजेदार उलटतपासणी घ्यायचे की, तो मजकूर सविस्तर द्यावा लागत असे. मोहिते मात्र अतिशय मोजक्या शब्दात काम चालवीत असल्याने त्यांचा मजकूर अत्यंत थोडा येत असे. त्यामुळे मोहिते बरेच नाराज झाले आहेत असे समजले.

मोहित्यांनी एक मुद्दा फार महत्त्वाचा मांडला. 'आरोपींनी आपापसात दागिन्यांचे वाटप केल्याची यादी' म्हणून जो पुराव्याचा कागद आहे, त्यात दागिन्यांचे वर्णन पंचनाम्यात लिहावे तसे आहे.

त्या कागदावरचे अक्षर जक्कलचेच आहे; पण भाषा इतकी उघड पोलिसी आहे की लहान पोरसुद्धा ओळखेल की ते नंतर लिहून घेतले आहे म्हणून. एकूण खाकी डोकी ती खाकीच. बनवाबनवी करायची तर तीसुद्धा नॅचरल वाटली पाहिजे.

### ७ सप्टेंबर १९७८ : ८० वा दिवस

मोहित्यांचे आर्ग्युमेंट संपले. आजचा त्यांचा भर 'प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र विचार करावा' या मुद्द्यावर होता. कटाचा आरोप उडाला तर सुटण्याचे सर्वांत जास्त चान्सेस जगतापलाच आहेत.

काशिनाथशास्त्री अभ्यंकर, भावी धन्वंतरी धनंजय यांच्या मृत्यूमुळे देशाचे नुकसान झाले आहे, अशी हळहळ व्यक्त करून मोहिते पुन्हा वकिली मुद्द्यावर आले. 'हे खरे असले तरी जगताप त्यात होता हे पुराव्याने सिद्ध होते का?'

या सगळ्या प्रकारात एक विचार मनात आला. अभ्यंकरांचे धाकटे भाऊ विंग कमांडर मोहनराव कधी कधी खटला ऐकायला येतात. त्यांच्या भावना काय असतील? देशासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून लढायचे म्हणजे काय? समाजाचे रक्षण करायचे म्हणजे कुणाचे? जो समाज तुमचे आई, वडील वगैरेंचे रक्षण करू शकत नाही, फुलासारखी पुतणी-पुतण्या चिरडून टाकतो, भयंकर प्रकारातून चोरीस गेलेले दागिने बेकायदा खरेदी करतो, समाजरक्षणासाठीचा कायदा आरोपींना योग्य संधी देण्याच्या नादात तुमच्या भावनांची कुचेष्टा, अवमान करतो त्या समाजाच्या रक्षणासाठी विमानविरोधी तोफांच्या भडिमारात स्वतःचे विमान बेदरकारपणे न्यायचे?

### ८ सप्टेंबर १९७८ : ८१ वा दिवस

नागूअण्णांचे आर्ग्युमेंट सुरू झाले. सुरुवात करतानाच ते म्हणाले; 'ज्यांच्यावर हा प्रसंग ओढवला आहे त्यांच्याइतकेच दुःख मला झाले आहे; पण मी माझ्या भावनांचे प्रदर्शन करीत नाही.' प्रास्ताविक संपल्यावर ते पुराव्यावद्दल बोलायला लागले. 'माणूस' नागूअण्णा आणि 'वकील' नागूअण्णा ही दोन व्यक्तिमत्त्वे इतक्या झटकन दिसली.

बोलायला काही फारसे नव्हतेच. शामराव सामंतांच्या आर्ग्युमेंटवर 'अतिव्याप्ति अव्याप्ति दोषो' असा त्यांनी शेरा मारला; पण हाच शेरा त्यांनाही लागू पडतो. अतिव्याप्तीच्या नादात ते हाती आलेला मुद्दा सोडतात.

### ११ सप्टेंबर ७८ : ८२ वा दिवस

नागूअण्णांचे आर्ग्युमेंट संपले. कामकाजही संपले. शेवटच्या वर्षाच्या, शेवटच्या पेपरातले शेवटचे गणित सोडविताना कंटाळा येतो, तसा कंटाळा आला होता. संपल्यावर फार बरे वाटले. सुनावणी सुरू झाली तेव्हापासून आजचा एकशेविसावा दिवस, चातुर्मासात कुणी काय, कुणी काय व्रते घेत असतील. आमचा जक्कलपुराणाचा चातुर्मास संपला!

काम संपल्यावर बापटसाहेबांना भेटलो. निकालाची तारीख २७ किंवा २८ देतील असे त्यांच्या बोलण्यावरून दिसते.

खरे तर आज नागूअण्णा फार कंटाळले होते. त्यांना एक दिवस वाढवून हवा होता; पण बापटसाहेबांनी 'लागेल तितका वेळ मी थांबेन; पण काम आजच संपवायचे,' ही भूमिका घेतल्याने बरे झाले.

जाताना आरोपी फार नर्व्हस दिसत होते. बहुतेक त्यांना स्वतःचे भविष्य समजले असावे. घरातल्या लोकांना भेटले. 'केसरी'च्या विजय बारभाईंशी तर बऱ्याच मोकळेपणे गप्पा मारीत होते. पूर्वी याच मंडळींची आणि बारभाईंची कॉलेजात असताना जोरदार मारामारी झाली होती. एके काळी भांडण असणारा वर्गमित्र कोर्टात येऊन गप्पा मारतो आणि जवळचे असणारे विरुद्ध साक्षी देतात याचे आरोपींना काय वाटले असेल?

### २८ सप्टेंबर १९७८ : ८३ वा दिवस

निकालाचा दिवस म्हटल्यावर परीक्षेच्या निकालासारखे टेन्शन आले होते. 'तरुण भारत'ने आज प्रचंड पुरवणी काढली आहे. 'केसरी' उद्या काढणार आहे. शिवाय दोघांचे जादा अंक. आमच्याकडे पुरवणी काढायची नाही, असा निर्णय झाल्याने मुख्य मजकूर इतरांपेक्षा कसा चांगला आणि किती जास्त देता येईल याचे टेन्शन फार होते.

तसा बंदोबस्त केला आहे. अनंत पाटणकर ('सकाळ'चे वार्ताहर) येरवड्याच्या तुरुंगातून आरोपींना बाहेर आणल्यापासून त्यांच्यापाठोपाठ स्कूटरवरून आला होता. द्वारकानाथ लेले ('सकाळ'चे सहसंपादक) साडेदहापासूनच कोर्टहॉलमध्ये होते, तसे ते सहजच आले होते; पण बातमी देताना त्यांची फार मदत झाली.

मी बादशहासारखा सव्वाअकरा वाजता कोर्टात गेलो तर बातमीदारांच्या खुर्च्या भरलेल्या! इंदिरा गांधी आल्यावर दीडशे बातमीदार, तसाच प्रकार झाला! चार महिने नियमित येणाऱ्यांना जागा नाही आणि हौशे-नवशे-गवशे खुर्चीवर.

आरोपींचे चेहरे फार उतरलेले दिसले. अनेक जण म्हणाले की, 'आरोपींच्या चेहऱ्यावर काही खंत नाही.' पण ते खरे नाही. पहिल्या दिवशी त्यांच्या चेहऱ्यावर जी मिजास दिसत असे ती दिवसेंदिवस उतरत चालली होती. आजचे त्यांचे चेहरे परीक्षेला

वर्गात गेल्यावर प्रश्नपत्रिका वाटेपर्यंतच्या काळात असावे तसे दिसत होते. सुतार बराच वेळ डोळे मिटून बसला होता त्यामुळे लोक म्हणत होते, ' देवाचा धावा करीत असेल.

पण मला खात्री आहे, तो सुटकेसाठी धावा करीत नसणार. एका बाजूने खुनी गुन्हेगार असणारा सुतार दुसऱ्या बाजूने आध्यात्मिक विचारात पोचलेला आहे. सदैव द्वैत-अद्वैत यांचा विचार करीत असतो. त्याला स्वतःच्या भविष्याची भीती वाटत नाही. ' मुलगा म्हणून जी कर्तव्ये असतात ती आपण पार पाडू शकत नाही. अत्यंत चांगल्या आई-वडील, भाऊ-बहीण वा नातेवाईकांना आपल्या वर्तनाने क्लेश दिले ' एवढेच त्याला दुःख वाटते.

टोळीप्रमुख जक्कल याचा इतर सहकाऱ्यांना खलास करण्याचा विचार होता असे जक्कलच्या डायरीतील नोंदीवरून दिसते, असे म्हणतात; पण त्याकडेही सुतार अत्यंत निर्विकारपणे पहातो.

न्यायाधीश बाहेर येण्याची वाट पहात लोक ताटकळत थांबले होते. त्या वेळी एक वकील म्हणाले, ' काल मुंबईला गेलो होतो. थ्री स्टार हॉटेलात उतरलो होतो. तिथे बाल्कनीतून रस्त्याकडे पहात असताना डोळ्यांसमोर खून झाला. एका माणसावर पाच-सहा जणांनी चाकूहल्ला केला आणि लगेच पसार झाले. हा प्रकार पहायलासुद्धा कोणी थांबले नाही. दोन मिनिटात जखमी माणूस पाचके देत पाणी पाणी करीत मेला; पण कुणीही त्याला पाणी दिले नाही. भररस्त्यावर गर्दीच्या वेळी हा प्रकार आणि आम्ही इथे विचारत होतो, त्या रस्त्यावर वर्दळ आहे की नाही? शेजारी वस्ती आहे की नाही? दिवसा इतकी बेफिकिरी असेल तर रात्री कोण लक्ष देणार ? '

ही गोष्ट खरी आहे. आरोपी खाजगीत सांगतात त्याप्रमाणे ' अभ्यंकरांच्या दारात कर्वे भेटलाच नव्हता. एक म्हातारे जोडपे मात्र आमच्याकडे पहात पहात गेले. अभ्यंकरांचे खून पडल्यानंतर किंवा आरोपींना अटक झाल्यावर काही कुणी म्हातारा-म्हातारी पोलिसांपुढे माहिती द्यायला हजर झाली नाहीत. '

बारा वाजून पाच मिनिटांनी बापटसाहेब बोर्डावर आले. त्यांनी कोणकोणत्या प्रकरणात कोणाकोणाला दोषी धरलेले आहे, हे सांगितले. साहेबांची तब्येत बरी नसावी, आवाजही बसलला होता. त्यानंतर आरोपींचे वकील बोलायला उभे राहिले. कोळसे पाटील आणि नहार यांनी एक-दोन मिनिटांतच आपले बोलणे आटोपले. मोहिते आणि नागूअण्णा यांनी कमी शिक्षा द्यावी, अशी विनंती केली. अशी विनंती आरोपींच्या सूचनेप्रमाणेच होत असते. याचा अर्थ जगताप आणि शा यांनी गुन्हा कबूल करून दयेची याचना केली आहे असा होतो.

शामराव सामंतांनी कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करणारे भाषण फार प्रभावीपणे मांडले.

वकिलांची भाषणे झाल्यावर साहेब परत चेंबरमध्ये गेल. बाहेर आल्यावर त्यांनी ' दया दाखवावी, सौम्य शिक्षा द्यावी ' या विनंतीला फार जोरदार उत्तर दिले. उत्तम वाङ्मयीन उताऱ्यासारखे उत्तर होते. आरोपींची लायकी कठोरात कठोर शिक्षा देण्याचीच आहे, असे सांगून ' चौघानाही फाशी आणि इतर गुन्ह्यांबद्दल एक ते सात वर्षे सक्त मजुरी ! ' ही ऑर्डर वाचून दाखविली.

फाशी हे शब्द ऐकताच संपूर्ण कोर्ट हॉलमध्ये जो आवाज घुमला तो विलक्षण होता. आनंद, तृप्ती, सुटकेचे समाधान सर्व काही त्या आवाजात होते. साय ऑफ रिलीफ किंवा सुटकेचा निःश्वास या शब्दांत त्याचे वर्णन होऊ शकणार नाही. काही जणांनी तर टाळ्या वाजविल्या. टाळ्यांचा आवाज ऐकताच बाहेर उभ्या असणाऱ्यांनी काय झाले म्हणून विचारले. राजू साबडे खिडकीपाशी उभा होता. त्याने गळ्याभोवती हात करून चार बोटे दाखविली. असा काही जल्लोष झालाय. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांच्या वेळी होती तशी गर्दी आणि जल्लोष झाला ! आरोपींचे नातेवाईक लगेच बाहेर पडले. आरोपींच्या चेहऱ्यांवर हास्य होते; पण ते निर्लज्जपणाचे नव्हते. पडेल उमेदवार कसे खोटे हास्य आणतो तसे वाटत होते.

निकालातले एक वाक्य फार गंमतीशीर होते. ' दे शुड बी हँग्ड, बाय नेक, टिल डेथ '. ' मरेपर्यंत फाशी ' हा प्रकार माहिती होता; पण ' गळ्याला फास लावून मरेपर्यंत फाशी ' हा वाक्प्रयोग मला माहिती नव्हता. हे ' बाय नेक ' शब्द असण्याऐवजी नुसतेच ' हँग्ड टिल डेथ ' हे शब्द असते तर फासात तंगड्या अडकवून मरेपर्यंत उलटे टांगून ठेवणे शक्य झाले असते. असल्या रोमँटिक कल्पना कुणाच्या डोक्यात येऊ नयेत म्हणून अशी वाक्यरचना असावी.

फाशीचा निकाल झाल्यावर पेनचे निब मोडणे वगैरे प्रकार झाला नाही. हा प्रकार फार जुना आहे. हल्ली फक्त तो हिंदी सिनेमात चालतो असे मागून कळले.

निकाल लागल्याबरोबर ए. सी. पी. हुल्ल्याळकर आणि इन्स्पेक्टर कदम यांनी आनंदाने एकमेकांना मिठी मारली. हा फोटो मिळाला आहे; पण निकालानंतर अभ्यंकर बाहेर पडले आणि समोर हुल्ल्याळकर दिसताच त्यांचे दोन्ही खांदे धरून निःशब्दपणे उभे राहिले. बाळ पुली या प्रसंगाचा फोटो घेत होते तेवढ्यात एकजण मधे घुसला आणि अभ्यंकरांना घेऊन निघून गेला. एक अप्रतीम फोटो हुकला.

कोर्टातून बाहेर पडताना अनेक पोलिस अधिकारी ' माझे नाव छापा, फोटो छापा ' म्हणत मागे लागले. रात्रीपर्यंत हा ताप चालू होताच. अर्थात ज्यांचे फोटो छापायला हवेत त्यांनी न सांगताच छापणार आहोत आणि ज्यांचे छापायला नकोत त्यांचे वाटेल त्या परिस्थितीत छापणार नाही.

ऑफिसात आल्यावर एस. के. कुलकर्णी ('सकाळ'चे वृत्तसंपादक) म्हणाले, ' तीन पाने कोरी ठेवली आहेत. भरपूर मजकूर द्या. ' द्या हे ठीक आहे; पण देणार कुठून ? सगळे कोर्टातले कामकाज चाळीस मिनिटांचे. पुन्हा पुन्हा छापलेला भाग द्यावयाचा नाही. मग जे काही लिहीत सुटलो, तेवढ्यात साहेबांनी बोलावले. ते ( संपादक श्री. ग. मुणगेकर ) म्हणाले, ' जजमेन्टची कॉपी मिळवा. ' म्हणून कोर्टात गेलो. टायपिस्ट एम. जी. तांबे म्हणाले, ' वाचायला देतो, कॉपी मिळणार नाही. ' म्हणून जजमेंट वाचले. कर्वे आणि परांजपे यांच्या साक्षीवर दिलेले तडाखे लिहून घेतले. सोनार मंडळींना सोडलेले दिसते. मॅजिस्ट्रेट महाशय एकाच वाक्यावर सुटले आहेत. चला निदान मजकूर तरी इतरांपेक्षा जास्तच आहे. पुन्हा भाषांतरात आपण आघाडी मारणारच !

राजू आणि मी रात्री एकपर्यंत लिहीतच बसलो होतो. एस. के. आणि कुवळेकर ( सहसंपादक ) थांबले होतेच. मजकूर भरपूर दिला आहे. आवश्यक असणारा प्रत्येक शब्द आणि प्रत्येक फोटो दिला आहे. अनावश्यक फोटो किंवा मजकूर अजिबात नाही! अंकाची पाने लावायला फोरमन खाटपे आणि कंपोजखात्यातल्या इतर लोकांनी फार मेहनत घेतली. अशा प्रसंगी एकट्या बातमीदाराचे श्रेय नसते. सर्व टीम चांगली असते; पण नाव फक्त आमचेच येणार म्हणून फार रुखरुख वाटत राहिली.

बाकीच्या वर्तमानपत्रांतही धमाल चालू होती. 'केसरी'चा जादा अंक छापून होईपर्यंत त्यांच्या दारात प्रचंड गर्दी आणि विक्रेत्यांच्या मारामाऱ्या झाल्या. पोलिस व्हॅन बोलवायला लागली. इतर वर्तमानपत्रांचे अंक 'केसरी'च्या दारात आणून विकायला ठेवले होते; पण लोक असे खमके की, 'केसरी'चा जादा अंक छापून व्हायची वाट पहात थांबले; पण इतर जादा अंकांना त्यांनी हात लावला नाही !

उद्या सगळ्या अंकांची तुलना करून पाहिली पाहिजे. अजून अर्धा तास थांबलो तर सगळे अंक पहायला मिळतील; पण झोप फार अनावर झाली आहे.

२९ सप्टेंबर १९७८

आज कुठलेच अंक वाचू नयेत असे वाटत होते. कुणाशी या विषयावर बोलू नये असेही वाटत होते. आज खरे म्हणजे 'सुटलो !' अशी भावना व्हायला हवी होती; पण फाशी या कल्पनेनेच कसे तरी वाटत होते. फाशी दिल्याने गेलेली माणसे परत येणार आहेत का ? आरोपींना या दिशेला वळायला कारण होणारी सामाजिक, मानसिक स्थिती संपेल का ?

ओळखीच्या, घरातल्यासारख्या माणसांनीच आपल्या मुलाचा खून केला हे समजल्यावर गोखले कुटुंबीय हादरले असतील. अनिलच्या खुनानंतर जक्कल गोखले कुटुंबियांबरोबर पोलीस ठाण्यावर गेला होता, त्यानेच फोटोचे प्रिंटस् काढले होते. त्यामुळे आरोपींना अटक झाल्यापासून त्यांच्या मनात सूडाचा, संतापाचा आगडोंब उसळला असेल ! निकाल लागल्यावर त्यांना आपल्या लेकराच्या मृत्युचा अंशत: सूड घेतल्याचा आनंद वाटला असेल. भारतीय युद्धानंतर द्रौपदीला वाटलेल्या समाधानासारखे वाटले असेल. हेगडे-गोखले यांच्या घरातला एक तुकडा कापला गेला. जोशीमंडळींपैकी एक तुकडाच उरला; पण उदय जोशीला अजून त्याचे आयुष्य आहे. रसरशीतपणे आयुष्य जगण्याचे दिवस आहेत; पण अभ्यंकरांचे काय ? त्यांना फक्त भूतकाळाच्या दु:खद स्मृती आणि वैराण, रखरखीत भविष्यकाळ ! आपल्या दु:खाला कारण झालेल्यांना शिक्षा व्हावी इतकी तरी भावना उरली असेल का ? सगळ्या भावना करपून गेल्या असतील ! बदला घेतला गेला, असे त्यांना क्षणभर तरी समाधान वाटले असेल का ? त्यांच्या दृष्टीने हा विषय संपलेला असेल की आरोपी फासावर गेले काय किंवा सुटले काय, काही वाटेनासेच झाले असेल ?

मग फाशी कशासाठी ? समाजासाठी ? समाज कोणता ? फाशी म्हटल्यावरही टाळ्या, सुटले असते तरी टाळ्या असे वागणाऱ्या समाजासाठी ?

दिवसभर असे लोक भेटलेत की, आपण कुठल्या असंस्कृत जगात आहोत असे वाटायला लागले आहे. एकेकाच्या सूचना अशा अप्रतिम आहेत ! 'सर्व शिक्षा वेगळ्या भोगायला लावून मग फाशी द्यावी,' 'हात-पाय तोडून सोडून द्यावे', 'उकळत्या तेलात टाकावे', 'जिवंत जाळावे', 'सालडी काढावी', 'दगडांनी ठेचून मारावे' अशा इतिहासकालीन शिक्षांच्या मनोराज्यात दंग होणाऱ्या समाजासाठी शिक्षा द्यायची ? परपीडा आनंददायक असते की काय ?

या मुलांना फाशी होणार या कल्पनेने मला मळमळून आले आहे. तसा या मुलांना मी बऱ्याच पूर्वीपासून ओळखतो. जक्कलचा मोठा भाऊ आमच्या कॉलेजात फोटो घ्यायला यायचा. चांगला पैलवान होता. जक्कलने माझ्या लग्नात फोटो काढले होते. या मुलांना मी विश्व आणि कल्पना हॉटेलात अनेकदा पाहिले होते. पाच-पंचवीस तरुण मुला-मुलींच्या घोळक्यात जक्कल एखाद्या राजपुत्रासारखा ऐटीत बसलेला असायचा ! अटकेनंतर त्यांची बरीच माहिती झाली. या चार महिन्यात तर आणखी माहिती समजली. आता त्यांचा राग वाटत नाही, चीड येत नाही. फक्त ही मुले अशी का झाली याचे गूढ वाटते आणि दया वाटते.

या मुलांविरुद्ध जे आरोप होते ते अतिशय भयानक होते; पण ही मुले नक्कीच इतकी नराधम नव्हती. काही तरी मानसिक अपघातातून या गोष्टी घडल्या असाव्यात. केवळ पैशासाठी खून केले नसावेत.

एक अशी स्टोरी आहे की, हेगडेचा खून होण्यापूर्वी आणि नंतरच्या काळात ही मुले कात्रजच्या घाटात आणि सातारा रोडवर वाटमारी करीत. मोटारसायकली चोरीत. पैसा हाच जर त्यांचा हेतू असता तर तो मार्ग किती तरी सोपा होता. मटक्याचा अड्डा चालवला असता तर पैसा मिळाला असता, वर पुढारी झाले असते.

खुनाचा हेतू काय, यावर चर्चा व्हायच्या त्या वेळी कुणी तरी एक फॅंटॅस्टिक कल्पना मांडली होती. 'मरणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावरील एक्स्प्रेशन्स कशी असतील याचा अभ्यास करण्यासाठी ही मुले खून करीत असतील.' पूर्वी मला ही शक्यता असंभवनीय वाटायची. पण इंग्रजी क्राईम स्टोरीजमध्ये अशा प्रकारची विकृती दाखवलेली असते. आर्ट स्कूलमधल्या मुलांच्या गप्पा किंवा मॉडर्न टच असणाऱ्या ललित कथांमध्ये असली मनोविकृती दिसते. कथा लिहून 'एक्स्पीरियन्स सेकंड हॅंड' मिळवितात तसा हा फर्स्ट हॅंड एक्स्पीरियन्सचा प्रकार नसेल कशावरून ?

मानवी व्यवहारांचे मूळ कामप्रेरणेत असते असे म्हणतात; पण या मुलांची प्रेरणा काही तरी वेगळीच असावी. संपूर्ण खटल्याच्या काळात इतक्या देखण्या, मादक टंच स्त्रिया त्यांच्याकडे पहात असत. पण एकाचीही नजर, एक क्षणही एकाही बाईवर स्थिरावलेली नव्हती. खटल्याचे टेन्शन असेल हे खरे; पण मानवी भावना असतात की नाहीत ? सापाच्या तोंडातला बेडूक माशी खातोच की !

'स्त्री' विषयात ही मुले संपूर्णपणे विरक्त होती असेही म्हणता येणार नाही. कारण एकट्या जक्कलचीच पंचवीस का तीस प्रेमप्रकरणे होती. एका वेळी तो वेगवेगळ्या बारा-तेरा मुलींना झुलवत होता. त्याच्यासाठी पागल झालेल्या मुलींमध्ये लाखोपतींच्या, बड्या-बड्या सरकारी अधिकाऱ्यांच्या मुली होत्या, रूपसम्राज्ञी म्हणाव्यात

अशा होत्या. या सर्वांचा नाद सोडून अत्यंत साध्या मुलीशी तो लग्न ठरवायला निघाला होता.

मीही कॉलेजात होतो. अनेक प्रकारची मुले-मुली पाहिली आहेत. हुषारी, गुंडगिरी, वासूगिरी, निवडणुका, नाटके, वेगवेगळ्या प्रकारचे खेळ अशा वेगवेगळ्या उद्योगांत वेगवेगळी मुले असतात. एका क्षेत्रात प्रावीण्य असणारी मुले फार तर आणखी एखाद्या विषयात रस घेतात. खेळात भाग घेणाऱ्यांचा नाटकाशी संबंध फक्त नाटक-पाडण्यापुरताच येतो. 'गोकुळात' नांदणारी मुले निवडणुकीच्या फंदात पडत नाहीत. पडलीच तर साफ पडतात. सर्वगुणसंपन्न कोणीच नसतो. अशा स्थितीत जक्कल हा 'सर्वगुण आणि सर्व दुर्गुणसंपन्न' मनुष्य झालाच कसा ? त्याला किंवा इतरांना काही वेळा फर्स्टक्लास मिळाला आहे. जगतापला तर स्कॉलरशिप मिळत असे. माफीचा साक्षीदार झालेला चांडक पहिला आला होता.स्कॉलर असणारी ही मुले काही वेळा नापास तरी झाली किंवा त्यांचा फॉर्म तरी अडवला गेला.

काही प्राध्यापक यांच्यावर डूक धरून होते. उलट काही प्राध्यापक यांना पेपर फोडत असत. जक्कलकडे असणारे संभाव्य प्रश्न हमखास परीक्षेत येत म्हणून अनेक मुले-मुली त्यांच्यामागे असत. काही प्राध्यापकांचा पेपर फोडण्याइतका विश्वास आणि काहींचे नापास करण्याइतके शत्रुत्व ही भानगड आहे तरी काय ?

कॉलेजच्या निवडणुकीत ही मुले निवडून येत. जक्कल 'आलिया भोगासी' एकांकिकेत हिरो झाला होता तर जगतापने पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत 'जनावर' एकांकिकेत बक्षीस मिळविले होते. अॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स, वेट लिफ्टिंग या स्पर्धांत जक्कल कॉलेज-तर्फे भाग घेत असे. त्याला गाण्या-बजावण्याची आवड होती. तो उत्तम फोटोग्राफर, उत्तम चित्रकार आहे हे तर सर्वांना माहिती आहेच.

कॉलेजात अभ्यास आणि अभ्यासेतर चळवळीत आघाडीवर असणारा जक्कल मारामारी, दादागिरी, गुंडगिरी करीत असे; पण त्याला कुणी दम भरला तर घाबरतही असे. शौर्य आणि घाबरटपणा यांचे असे काय मिश्रण असेल ?

चौघांमध्ये त्याचे इंग्रजी सर्वांत कच्चे आहे, असे बाकीचे आरोपी म्हणत; पण त्याला इंग्रजी समजते उत्तम. इतकेच नाही तर त्याने सायकॉलॉजीवर बराच विचार केला आहे. त्यांच्या कॉलेजातल्या मुलांच्या म्हणण्याप्रमाणे सुतारला अध्यात्माची आणि जक्कलला मानसशास्त्राची आवड होती.

हुशार, उनाड, फर्स्टक्लास मिळविणारा, नापास होणारा, चित्र-कला-नाट्यकला-संगीतकला यांत रस आणणारा, अनेक खेळांत भाग घेणारा, निवडणुका जिंकणारा नेता, प्रेमवीर, तत्त्वचिंतक अशा किती तरी रंगांची सरमिसळ असणारा हा मुलगा महाभयानक स्वरूपाची गुन्हेगारी करतो, हा काय प्रकार असेल ? दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकार असतात; पण हे बहुभंग झालेले व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. सर्व मानवी प्रवृत्ती एकवटलेला हा गूढ मनुष्य त्याच्या व्यक्तिमत्त्वातील एका अंगाबद्दल फाशी जाणार ? विजयराव मोहिते म्हणाले होते ते खरे आहे, 'गुन्ह्याचा द्वेष करावा. गुन्हेगाराचा द्वेष करू नये.' पण समाज गुन्हेगाराचा द्वेष करतो. जक्कलचे व्यक्तिमत्त्व इतके इंद्रधनुषी आहे. त्यातला फक्त तांबडा रंगच बाकीच्या सद्दा रंगांना व्यापून टाकतो आहे.

समाजधारणेसाठी आपण काही तरी कायदे करतो. त्यानुसार शिक्षा देतो; पण शिक्षा देऊन प्रश्न सुटतात का ? शिक्षा न देऊन तरी कसे चालेल ? प्रचंड गोंधळ आहे गोंधळ !

या मुलांची बुद्धी कशी काम करीत असेल ? एक डिसेंबरला अभ्यंकर प्रकरण झाले त्या वेळी त्यांच्या मनात स्मृति बंगला नव्हताच म्हणे. लॉ कॉलेजसमोरचा 'विद्याधन' किंवा असेच काही तरी नाव असणारा बंगला हेरून ठेवला होता; पण ऐन वेळी तिथे बरेच पाहुणे आल्याने बेत रद्द करून परतताना स्मृति बंगल्यात जायचा विचार सुचला. ही गोष्ट खरी असेल तर 'विद्याधन'-मधल्या मंडळींची आयुष्याची दोरी काय बळकट असेल !

एका आरोपीशी संबंधित मंडळी वरची स्टोरी सांगतात तर दुसऱ्या एखाद्या निकटवर्ती मंडळींच्या सांगण्याप्रमाणे कॉमर्स कॉलेज-समोरचा बंगला त्यांनी ठरविला होता. या गोष्टींपैकी कोणती खरी की आरोपी इतरांची गंमत करीत असतील किंवा त्यांना ओळखणारे, बोलणारे लोक त्यांच्या नावावर काही तरी सांगत असतील ?

तपासाच्या काळात 'जक्कलची डायरी' हा विषय फार चर्चेत होता. त्यात चौदा बंगल्यांची नावे होती अशी चर्चा होत असे. 'डायरी आहे' असे काही पोलिसअधिकारी गप्पा मारताना सांगत. दुसऱ्या एका आरोपीच्या म्हणण्याप्रमाणे 'सर्वांत शेवटी आम्हालाही संपविण्याचा त्याचा बेत त्याच्या डायरीत होता', हे सगळे खरे असेल तर त्याची डायरी गेली कुठे ? पुराव्यात का आली नाही ? कदाचित असेही असेल की, डायरीत घटना असतील आणि त्या प्रॉसिक्युशन स्टोरीशी जुळणाऱ्या नसतील !

पुण्यातले तीस-चाळीस प्रतिष्ठित लोक सांगतात. 'त्या चौदा-जणांच्या यादीत आमचा नंबर होता असे अमुकतमुक साहेब म्हणाले!' हे सर्व अमुकतमुक साहेबलोक असे का सांगत असतील ? की या प्रतिष्ठित मंडळींना आपले नांव त्या यादीत असणे हा 'स्टेटस सिंबॉल' वाटत होता ? ती डायरी पहायला हवी एकदा तरी.

आरोपींना तरी एकमेकांबद्दल विश्वास वाटतो की नाही याबद्दल शंकाच आहे. प्रत्येक जण दुसऱ्याबद्दल वेडेवाकडे बोलल्याच्या बातम्या कानावर येतातच. पोलीस, जेलचे अधिकारी, डॉक्टर्स, आरोपींचे मित्र, वकील, वकिलांचे सहाय्यक यांच्या तोंडून समज-लेल्या गोष्टी, इतर बातमीदारांशी बोलताना त्यांनी दिलेली माहिती, माझा आणि आरोपींचा संवाद किंवा आरोपी इतरांशी बोलताना मी स्वतः ऐकलेल्या गोष्टी या सर्वांतून एक प्रचंड प्रश्नचिन्हच उरले आहे.

चौघेही फाशी गेल्याने प्रश्नचिन्हे संपतील का ? 'विश्वसनीय गोटातून' समजणाऱ्या गोष्टीही इतक्या परस्पर विसंगत आहेत की त्यातून गूढ अधिकच वाढते आहे. आरोपी स्वतःच याबद्दल सांगू शकतील किंवा त्यांच्या लहानपणाविषयीची माहिती घरातले लोक देऊ शकतील. पण त्यांची मनस्थिती आत्ता तशी नसणार.

××× एका आरोपीला भेटलें आणि माहिती विचारू लागलें तेव्हा तो म्हणाला, 'दहा हजार रुपये ठेवा मग सांगतो. अजून कुठल्या दहा हजाराचे आकर्षण आहे ? आणि ते कशासाठी ?

आरोपीच्या घरच्या लोकांना तरी कोण विचारणार? कारण एका भिकार साप्ताहिकाचा प्रतिनिधी म्हणवणाऱ्या टुकार माणसाने 'मी पोलिसइन्स्पेक्टर आहे' असे सांगून आरोपीच्या घरातून त्यांचे फोटो नेले ते अजून परत मिळालेले नाहीत. एका आरोपीच्या नातेवाइकांनी डोळ्यात पाणी आणून सांगितले 'तो जाणारच, पण त्याचा एक फोटोसुद्धा आमच्याकडे नाही!' अशा स्थितीत कोणी लेखक-पत्रकार त्यांच्या घरी गेला तर माहिती देण्याऐवजी पायातला बूट काढतील !

जक्कल आणि इतरांनी त्यांची सविस्तर आत्मचरित्रे लिहायला हवीत; पण माझ्यासारख्या माणसाचे कुतूहल शमविण्यासाठी फाशी-गेटच्या भयाण वातावरणात बसून ते आत्मचरित्र कशाला लिहितील? त्यांना चिंता असेल अपिलाची-फेरअपिलाची आणि वेळ आल्यास दयेच्या अर्जाची !

आपण हे सर्व का केले? कसे केले? मरणाऱ्यांच्या चेहऱ्याकडे पाहून काय वाटले? त्यांच्या मनाच्या साऱ्यासाऱ्या उलाढाली समजल्या पाहिजेत. त्यांना कुणी तरी हे पटवून द्यायला हवे; पण पटवून देणाराच कुणी नाही! आरोपींचा कुणावर विश्वास नाही. ज्यांच्यावर असेल ते माझ्या ओळखीचे नाहीत.

अनेक गुण असणाऱ्या माणसांचा सैतान कसा झाला? त्यांच्यातला सैतान कापात असताना मनातला माणूस जागा होता का? जागा असला तर त्याने आक्रोश कसा केला असेल? सारे सारे अनुत्तरित राहणार.

सध्या त्यांचा मूड अपिलाचा असणार! अपिलात ते सुटले तर या विषयावर काही बोलणारच नाहीत समजा, शिक्षा कायम झाली तर त्यांचा मूड काही बोलावे-लिहावे असा राहिलेलाच नसेल !

दहा बळी पडले त्यांचा गळा आवळला तो आवाज फुटू नये असा. मुकाट्यानेच सारी तडफड झाली असेल! बेकायदा फासाने गेले ते बळी मुकाट्यानेच गेले! आता सरकारमान्य आणि कायदेशीर फासावर जाणारे अकरा, बारा, तेरा आणि चौदावे बळीही मुकाट्यानेच जाणार का? का फासाचाच हा अंगभूत स्वभाव आहे?

समाप्त



# माणूस दिवाळी अंक : दोन विशेष लेख

□ **एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर तळपलेला सूर्य**

**डॉ. कार्ल मार्क्स**

लेखिका : **सुमती देवस्थळे**

□ **मर्ढेकरांच्या शोधात**

**विनय हर्डीकर**

नेते आणि नव्यानं स्थापन झालेल्या अनुसूचित जाती-जमातीविषयक आयोगाचे अध्यक्ष ) ही मंडळी, 'जातीय पायावर आधारलेल्या संघटनांच्या जाळचातून बाहेर पडून मागासवर्गीयांनी सर्व ( प्रकारच्या ) पददलितांचा मुक्तिलढा उभारण्याचे प्रयत्न मानवतावादी पातळीवरून करावेत,' असा विचार मांडतात, तर दुसरीकडे मागासवर्गीयांचे व प्रस्थापितांचे। उच्चवर्णीयांचेही स्थानिक नेते ( विशेषत: उत्तर भारतात ) सशस्त्र लढ्याच्या पातळीवर उतरण्याची भाषा बोलतात – क्वचित तशी कृतीही होते. अशा प्रकारचा हा गोंधळ समाजाला नक्की नेणार आहे तरी कुठं, या संभ्रमात सापडलेल्या तुमच्या-मझ्यासारख्या सामान्य माणसाला डॉ. आंबेडकरांचेच उद्गार आठवल्यावाचून राहत नाहीत. त्यांच्या त्या उद्गारांनी प्रश्न मिटतो। सुटतो असं नाही; पण प्रश्नचिन्हाची संभाव्य व्याप्ती, दिशा, धोका यांचा अंदाज आल्यावाचून राहत नाही. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी – म्हणजे घटनात्मक लोकशाहीच्या उंबरठ्यावर देश उभा असताना – या घटनात्मकतेचे द्रष्टे शिल्पकार असलेले डॉ. आंबेडकर म्हणाले होते – '२६ जानेवारी १९५० रोजी अंतर्विरोधाने भरलेल्या एका आयुष्यक्रमात आपण पदार्पण करणार आहोत. आता आपल्या आयुष्यात राजकीय समता आणि आर्थिक विषमता एकत्र नांदणार आहेत. राजकारणात 'एक व्यक्ती – एक मत – एक मूल्य' हे तत्त्व आपण स्वीकारणार आहोत, तर प्रस्थापित सामाजिक व आर्थिक चौकट सामाजिक जीवनात हे तत्त्व नाकारणार आहे – या विसंगती शक्य त्या तातडीनं आपण दूर केल्या नाहीत तर या आर्थिक–सामाजिक विषमतेचे बळी ठरलेले लोक लोकशाहीच्या या राजकीय चौकटीच्याच ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून देतील...!' ❋

## □ 'प्रौढ-शिक्षणाचा श्रीगणेशा!'

बेचाळीस कोटी! म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या चक्क दोनतृतीयांश! स्वतंत्र भारताच्या निरक्षर नागरिकांची ही संख्या काही लहानसहान नव्हे. अखेर जनता सरकारचं लक्ष या प्रश्नाकडे वेधलं आहे आणि दोन ऑक्टोबरला राष्ट्रीय प्रौढ-शिक्षण योजनेचं गलबत समुद्रात ढकललं गेलं आहे. तब्बल सहाशे कोटी रुपये खर्चाची ही पंचवार्षिक योजना निदान दहा कोटी निरक्षरांना शिक्षणाचा श्रीगणेशा करून द्यायचा प्रयत्न करणार आहे आणि लवकरच प्रत्येक राज्यात एका ठिकाणी या प्रमाणात तिची अधिकृत उद्‌घाटनं होणार आहेत. ( जाता जाता – सहाशे कोटींपैकी किती पैसा या वीसबावीस उद्‌घाटनांमध्ये खर्ची पडेल? हिशोबच करायला हवा! )

प्रौढ-शिक्षणकार्यक्रमाचा संकल्प सोडून एक अत्यंत समयोचित कार्य सरकारनं हाती घेतलं आहे. यापूर्वीच्या सरकारनंही थोड्या फार प्रमाणात या प्रश्नात लक्ष घालायचा प्रयत्न केला होता. कृषक साक्षरता योजनेसारखे प्लॅन्सही आखले होते. १९६५ मध्ये यूनोच्या पुरस्काराने एक जागतिक साक्षरता-कार्यक्रम प्रयोग म्हणून राबविण्याचा उपक्रम झाला होता; परंतु भारतीयांच्या वाढत्या निरक्षर–संख्येनं या कशालाही दाद दिली नाही. स्वातंत्र्यानंतरच्या तीन दशकात निरक्षरांच्या संख्येत थोडीथोडकी नव्हे, दहा कोटींची भर पडली. आजही आंध्र, बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, आसाम, पश्चिम बंगाल आणि राजस्थान या राज्यांतले ९०% हरिजन आणि आदिवासी निरक्षरच आहेत. अशा स्थितीत शिक्षणखात्याच्या अंदाजपत्रकात फक्त एक टक्काइतकीच रक्कम आजपर्यंत निरक्षरता निर्मूलनकार्यासाठी राखून ठेवलेली असे. आता मात्र कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च व तज्जन्य कारभार – खर्चातला ७५% खर्च एवढी जबाबदारी सरकार उचलणार आहे. कार्यक्रमाचे लवकर विकेंद्रीकरण व्हावे, यासाठीच केंद्रात 'भारतीय प्रौढ शिक्षण मंडळ' तर राज्याराज्यात त्यांच्या शाखा सुरू करण्यात येत आहेत. सेवाभावी स्वयंस्फूर्त संस्था – संघटनांवर सरकारची मदार फार असणार आहे. अशा प्रत्येक संस्थेनं आपल्या विभागात दहा तरी केंद्रं चालू करावीत, अशी अपेक्षा आहे.

अशा केंद्रांमधून मार्गदर्शक म्हणून प्रारंभी सुमारे ४० हजार शिक्षितांची जरूरी भासेल. शिक्षक, विद्यार्थी, सेवानिवृत्त कर्मचारी, सुशिक्षित बेकार, अल्पशिक्षित गावकरी यातलं कुणीही मार्गदर्शक म्हणून काम करू शकेल, अशा व्यक्तीला दरमहा ५० रु. मानधनही मिळेल. सुरुवातीला नऊ महिन्यात किमान तीनशे ते साडेतीनशे तास शिक्षण व्हावं, हे उद्दिष्ट राहील. एकूण कार्यक्रमाचे दोन टप्पे असणार आहेत – ऑक्टोबर ७८ ते मार्च ७९ हे सहा महिने हा पूर्वतयारीचा टप्पा आणि पुढची पाच वर्षे हा प्रत्यक्ष, जोरदार कामाचा टप्पा! पूर्वतयारीच्या टप्प्यामध्ये या योजनेच्या तत्त्वांवर, स्वरूपावर विस्तृत चर्चा होणे अपेक्षित आहे. त्याचसाठी सरकारने अजून या योजनेची उद्दिष्टे स्पष्टपणे जाहीर केलेली नाहीत. या योजनेचं स्वरूप लवचिक असावं, तिच्या मार्गांमध्ये विविधता असावी आणि कार्यवाहीत विकेंद्रीकरणाचा प्रभाव दिसावा अशी अपेक्षा आहे. साक्षरताप्रसार हा तर या योजनेचा गाभाच असणार, परंतु त्याहीपुढे जाऊन शिकणाऱ्यांच्या स्वावलंबी विकासाला आवश्यक अशा अनेक गोष्टींचा समावेश या योजनेत केला जावा, असं सरकारला वाटतं – शिकणं, काम करणं आणि जगणं या तीन गोष्टींना अखेर एकच अस्तित्व असत हे त्यायोगे या प्रौढांना कृतिशीलतेनं समजावून घेता येईल.

प्रौढसाक्षरतेसाठी यापूर्वी वेळोवेळी हाती आलेल्या योजनांना म्हणावं तसं यश लाभल्याचं दिसत नाही. विशेषत: अगदी तळातले समाजघटक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले वर्ग यांच्यापर्यंत या योजना फारशा झिरपू शकल्या नाहीत. आजही देशात दलितवर्गापैकी फक्त १५% आणि आदिवासींपैकी फक्त ११% लोक साक्षर आहेत आणि हरिजन व आदिवासी स्त्रियांचा विचार केला तर जेमतेम ५% साक्षरता आढळेल. सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे साक्षरतेचं महत्त्वच अजून या वर्गांपैकी बहुसंख्याकांना जाणवत नाही. दोन वेळची भाकरी मिळविताना मारामार

होणाऱ्यांना रात्रीच्या साक्षरतावर्गांना ओढून आणणं ही किमया महाकर्मकठीण ठरली आहे. शिवाय भरपूर लिहायला – वाचायला शिकलेल्यांपैकी अनेक जण बेकारच राहिल्याचं दृश्य त्यांना पदोपदी आसपास दिसत असतं. यामुळेच तर आजवरचे सर्व प्रौढ साक्षरताप्रसाराचे प्रयत्न, हे निव्वळ ‘सह्याजीराव’ तयार करण्याचे कारखाने म्हणून कुप्रसिद्ध ठरले आहेत.

अर्थात ताज्या प्रौढ-शिक्षण योजनेत अभिप्रेत असलेली ‘व्यावहारिक । उपयोज्य साक्षरते’ची (functional literacy) कल्पना, वर उल्लेखिलेल्या अडचणीवर काही इलाज करू शकेल. भारतात ही कल्पना नव्यानंच अमलात येणार आहे आणि प्रौढ-शिक्षणाचं काम ज्यांच्याकडे सोपविण्यात येणार आहे त्या संस्थांनी ही कल्पना समजावून घेऊन अमलात आणणं जरुरीचं आहे. प्रौढ निरक्षरांना केवळ अक्षरं गिरवायला लावण्याऐवजी त्यांच्या तर्कबुद्धीचा वापर करायला लावणं, त्यांच्या त्यांच्या व्यवसायात अधिक कार्यक्षमता मिळविण्यासाठी त्यांना प्रशिक्षणाद्वारे प्रवृत्त करणं आणि त्यांना सामाजिक । राजकीयदृष्टया अधिक जागरूक असे नागरिक बनविण्यासाठी प्रयत्न करणं हा (functional literacy) चा थोडक्यात अर्थ सांगता येईल. आपल्याला देण्यात येणाऱ्या या शिक्षणाचा आपल्या व्यावहारिक आयुष्याशी असा काही (फायदेशीर) संबंध आहे, याची खात्री पटल्याशिवाय जीवनाचा अनुभव आणि ‘कॉमनसेन्स’ भरपूर असलेले प्रौढ एकदम अक्षरं गिरवायला तयार होणार नाहीत. या संदर्भात शिक्षण देणाऱ्यांची जबाबदारी वाढेल आणि अर्थातच त्यांना प्रशिक्षण देणाऱ्यांची – पर्यायानं शासकीय शिक्षणशास्त्रज्ञाची – जबाबदारी वाढल अर्थात, functional literacy पाशीच न थांबता प्रौढांच्या सर्वांगीण शिक्षणाचा कार्यक्रम सरकारनं हाती घ्यावा, असा आग्रह धरणारे तज्ज्ञही आहेत. ‘आपल्या जीवनपद्धतीचं स्वतःच योग्य मूल्यमापन करता येण्याइतकी प्रगल्भता ज्यामुळे निरक्षर प्रौढांना देता येईल, असा कार्यक्रम म्हणजे खरं सर्वांगपरिपूर्ण प्रौढ शिक्षण, अशी व्याख्या करून तिच्या समर्थनासाठी ते गांधीजींचं पुढील वचन उद्धृत करतात – ‘फक्त साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, तर स्त्रीपुरुषांना सुशिक्षित करण्याचं ते एक साधन मात्र आहे. केवळ मुळाक्षरांचं ज्ञान, ही शिक्षणाची चांगली सुरुवातही नव्हे, शेवट तर नव्हेच नव्हे. मुळाक्षरांचं शिक्षण हे दैनंदिन व्यवहारोपयोगी ज्ञानाच्या जोडीनंच झालं पाहिजे . . . ’

हे सगळं चित्र तत्त्वतः आणि वरकरणी फारच मोहक आहे. इतकं सुंदर की, त्यामुळेच कधीकधी एखाद्याच्या संशयी मनात शंका उद्भवते की हा कार्यक्रम यशस्वी व्हावा, असं सरकारला खरोखरच मनापासून वाटतं का ?

वाटत असेल आणि तसा तो यशस्वी झालाही, तर सरकारला त्याचे परिणाम परवडणार आहेत का ?

नव्यानं साक्षर होणारे हे दहा कोटी प्रौढ जागरूक नागरिक आपल्या शोषणाची जाणीव नव्यानं होऊन त्याविरुद्ध उभे ठाकले, तर त्यांचे प्रश्न सरकार कसे सोडवू शकणार आहे ? दारिद्र्य आणि उपेक्षा यांचे निष्क्रिय, असहाय बळी होऊन यापुढेही राहायला त्यांनी नकार दिला तर त्यातून निर्माण होणारी समस्या सरकारला हाताळता येणार आहे का ?

– पण असो. या खूपच पुढच्या गोष्टी झाल्या. सध्या तरी सरकारच्या भलेपणावर विश्वास वगैरे ठेवून या महत्त्वाच्या राष्ट्रव्यापी योजनेच्या कार्यवाहीत सरकार पुरेशा सावकाशीनं घाई करील, अशी आशा करायला हरकत नसावी ! ❊

## महापुर येता घरा...

‘नेमेचि येऊन’ जाणारा पावसाळा सगळे नेमनियम धडकावून लावून प्रलयासारखा कोसळला, म्हणजे काय काय घडू शकतं आणि मोडू शकतं, याची कडवट (की पाणचट ?) चव उत्तर भारतानं बाजवीपेक्षा जास्तच तीव्रतेनं चाखली आहे. अशा राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी भारतातूनच नव्हे, तर परदेशांतूनही मदतीचा ओघ अव्याहत वाहू लागल्याचंही आपण अनेकवार पाहिलंय्. फक्त हा ओघ, जलौघानं उद्ध्वस्त झालेल्याऐवजी भलत्याच मंडळीच्या दारातल्या – परसातल्या बागा कसा फुलवतो, हे मात्र तुम्हाआम्हाला कधी पाहायला मिळत नाही. ‘बघे’पणाचा हा नाजूक उद्योग करून ‘ऑनलूकर’नं आपलं नाव सार्थ केलंय.

अलीकडच्या महापुरानंतर सुरू झालेल्या मदतकार्यांची जरा बारकाईनं पाहणी केली, तर ‘महापूर कुणाच्या घरात आला आणि दिवाळी–दसरा कुणी साजरा केला,’ हे बरोबर लक्षात येईल दिल्लीच्या ‘दीनदयाळ रीसर्च इन्स्टिटयूट’चे सचिव डॉ जे. के. जैन हे मदतपथक घेऊन उत्तर प्रदेशाच्या अंतर्भागातल्या खेड्यात धावले, तेव्हा त्यांच्या असं ध्यानात आलं की, शहरालगतच्या ग्रामीण भागामध्ये सगळं मदतकार्य एकवटलं जातं, आणि शहरांपासून दूरच्या ग्रामीण भागातले लोक मात्र पूर ओसरून गेल्यानंतर रोगराई, दुष्काळ ( ! ) आणि भूक–बलिदान या आपल्या भवितव्याकडे एकटेच, आधारहीन चालत जातात ! त्यांना थोडीशी मदत केली, तरी आपला उद्ध्वस्त घरसंसार पुन्हा नव्यानं उभारायची हिंमत ते जरूर दाखवितात; पण पूर-दुष्काळासारख्या राष्ट्रीय आपत्ती म्हणजे स्वस्तात घाऊक माल मारण्याची राष्ट्रीय संधी असं समजणारे गावपुढारी, तालुकापुढारी आणि जिल्हापुढारी झारीतले शुक्राचार्य बनून त्यांच्यापर्यंत साहाय्याचा थेंबही झिरपू देत नाहीत ! बहुसंख्य राज्यांत मदतीचं वाटप करण्याचं कार्य, त्या राज्यातील सत्ताधारी पक्षांच्या संलग्न संघटनांकडे किंवा सरळ बोलायचं तर सत्ताधाऱ्यांपैकी बलिष्ठांच्या प्रमुख चमच्यांकडे आणि पर्यायानं स्थानिक दादांकडे जातं. साहजिकच भ्रष्टाचाराला ऊत येतो ! काही पुढारी मदतनिधी ही खाजगी मालमत्ता समजून अडाणी व गरजू आपद्ग्रस्तांना ती व्याजानं देतात आणि त्यांच्याच हक्काच्या पैशातून आपली सावकारी नव्या जोमानं सुरू करतात. काही मात्र तेवढेही कष्ट घेत नाहीत आणि संपूर्ण मदतीचाच अपहार होतो! राज्यातील विरोधी पक्ष आणि त्यांच्या संघटना यांना मात्र या मदतकार्यापासून कटाक्षाने दूर ठेवून, त्यांचं चारित्र्य शुद्ध राहील याची दक्षता घेण्यात येते सेवाभावी खाजगी मंडळे / सांस्कृतिक, सार्वजनिक संस्था / मिशन्स यांचे मदतकार्यच काय ते प्रामाणिकपणे चालते बाकी सारा अंधार. आणि म्हणूनच जनता पक्षाच्याच एका केंद्रीय मंत्र्यांनी अलीकडेच (खाजगीत) काढलेले उद्गार सार्वत्रिकरीत्या खरे ठरतात. ‘बिहारच्या राजकारण्यांची उत्पन्नाची साधनं तीन आहेत – शेती, खाणी आणि पूर-दुष्काळ मदतनिधी ! ’ □

# तृष्णा

## नाव सोनूबाई

'तृष्णा' हे सुरेख नाव, जी. पी. सिप्पींची निर्मिती, अनिल गांगुलींचे दिग्दर्शन आणि संजीवकुमार, राखी, गुलजार ही बडी नावे. साहजिकच 'तृष्णा'चा बोलबाला खूप झालेला; पण प्रत्यक्ष चित्रपटाने मात्र चांगलेपणाचे समाधान नाहीच; पण वेगळेपणाचे समाधानही दिले नाही.

एक अत्यंत बिझी डॉक्टर. पूर्वायुष्यातील त्याचे प्रेम आठवून आता बोअर झालेली त्याची पत्नी. तिच्या आयुष्यात खळबळ माजविणारा तिचा कॉलेजातील क्लासमेट. असा फर्मास त्रिकोण तयार झाल्यावर मग त्याला रहस्याचे एक ढिगळ लावून व ते पुन्हा उसवून गोड शेवटापर्यंत जाणे ही नेहमीची पाटी 'तृष्णा'मधून सार्‍यांनी पुन्हा टाकली.

अमरजीत यांच्या असल्या अत्यंत तकलादू कथेची पटकथा मात्र सचिन भौमिक यांनी सुरेख उभी केली आहे; पण तीही फक्त पहिल्या अर्ध्या भागात. विशेषत: राखीला आठवणारे सर्व जुने सुखी क्षण तीन–चार फ्लॅशबॅकने छान गुंफले आहेत; पण त्या वेळीच काहीसा भावनात्मक पातळीवर जाणारा हा चित्रपट पुढे हे धागे कचकच तोडल्याने किंवा निसटल्याने अत्यंत सामान्य बनतो.

'तुलसी' ज्याप्रमाणे संपूर्ण चित्रपट नूतनने तोलला आहे, तशीच जबाबदारी या चित्रपटात संजीवकुमारने उचलली आहे. बायकोवर निरतिशय प्रेम करणारा साधासीधा तरुण डॉक्टर, नंतर व्यवसायात गुंतून पडल्याने बायकोबद्दल निष्काळजी राहणारा नवरा, बायकोबद्दलच्या संशयाने पछाडलेला सुनील संजीवकुमारने अतिशय अप्रतिम उभा केला आहे. ऑपरेशन-थिएटरमधून बाहेर पडताना असलेला त्याचा थकलेला चेहरा, विद्यार्थ्यांना एखादा भाग समजावून देताना असलेला शिक्षकी चेहरा, झोपेतून उठवल्यानंतरचा त्याचा आळसावलेला चेहरा असे कित्येक बारकावे सांगता येतील. चेहरा चॉकलेटी ठेवण्याचा प्रयत्न न करता जास्तीत जास्त खरेपणाने आपली भूमिका प्रेक्षकांपर्यंत त्यानेच भिडवली आहे.

राखीचा चिरका आवाज (त्यात ती या चित्रपटात बऱ्याचदा तशा आवाजात हसते आणि ओरडते ते जास्त भयानक आहे!) आणि कोरा वाटोळा चेहरा तर वीट येण्याइतका नकोसा होतो. तीच गोष्ट शशीकपूरबद्दल. त्याला तर तरुण म्हातारा म्हणावे की म्हातारा तरुण, असा प्रश्न पडण्याइतका त्याच्या 'उमदा, दिलदार तरुण' या भूमिकेने वैताग दिला आहे. आधी तो तरुण वाटत नाही, मग उमदेपणा अन् दिलदारपणा तर दूरच. बिंदू–एका वेगळ्या भूमिकेत एवढाच उल्लेख पुरेसा.

संवाद म्हणण्याच्या बाबतीत ही एकसुरीपणा फक्त संजीवकुमारनेच टाळलेला. बाकी सगळ्यांचे ठरलेल्या पट्टीतील घडावाचन.

चित्रपटाला संगीत आहे कल्याणजी–आनंदजींचे. 'दिन–ब–दिन वो मेरे दिल से' हे लता मंगेशकरांचे गीत सुरेख–चाल व शब्द दोन्ही दृष्टींनी. बाकी दोन्ही गीते म्हणजे एका पठडीतून काढून दुसऱ्या पोतडीत कोंबलेली.

चित्रपटाचे छायाचित्रण कै. द्वारका द्विवेचा यांचे. चित्रपट त्यांच्याच स्मृतीला अर्पण केला आहे; पण 'शोले'तील अफलातून द्वारका द्विवेचा या चित्रपटात काही थोडे अपवाद वगळता दिसत नाही.

अर्थात आज-काल प्रेक्षकांचा घसा इतका कोरडा पडलाय की, तहानच मेल्यासारखी झाली आहे. त्यामुळे 'तृष्णा' हे मृगजळही 'वसंत'वर बरेच दिवस हिंदकळत राहील. □


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**

लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

चित्रपट । सदानंद बोरसे

# न्यू आझाद सर्कस

## काही वैशिष्टये, काही कमतरता

प्रमोद फिल्म्सच्या बॅनरखाली प्रोप्रायटर–रिंगमास्टर प्रमोद चक्रवर्तीची न्यू आझाद सर्कस तंबू टाकून खेळ करीत आहे.

या सर्कशीची आढळलेली काही किरकोळ कमतरता नमूद करीत आहे.

वैशिष्टय क्र. १ – सर्कशीतील झुल्यावरील खेळ, मृत्युगोल, वाघ व माणसाची लढत, प्राण्यांच्या कसरती इत्यादी सर्व खेळ एकत्र गुंफणारी एक गोष्ट गुलशन नंदा आणि सचिन भौमिक यांनी रचली आहे अर्थात गोष्टीपेक्षा या खेळांनाच अधिक महत्त्व असल्याचे प्रोप्रारिमांनी सांगितले असल्यामुळे गोष्ट खूप ओबडधोबड झाली आहे; पण त्यामुळे मधूनच आपण चित्रपटासारखे काही तरी पहात असल्याचे प्रेक्षकांना वाटू लागते. सर्कस–जगतात असे चित्रपटाचे प्रोजेक्शन आणणं हा प्रयोग अत्यंत अभिनव आहे. शिवाय अशा रीतीने सर्कस–चित्रपट–सर्कस–चित्रपट असे सारखे करीत प्रेक्षकाला दोन्हींपासून अलिप्त ठेवण्याचाही यशस्वी प्रयोग त्यात साधला आहे. सर्कसमध्ये काम करणाऱ्या कसरतपटूंना व प्राण्यांनाच चित्रपटातही घेतल्यामुळे त्यांच्यामधील सुप्त अभिनयकौशल्यालाही वाव मिळाला आहे.

वैशिष्टय क्र. २–आजपर्यंतच्या बहुतेक सर्कशींमध्ये चिंपांझीने अथवा गोरिलाने निरनिराळी कामे करून दाखविणे असे प्रयोग असत; पण त्या वेळी तो चिंपांझी अथवा गोरिला स्वतःचे रूपांतर करीत नसे. आझाद सर्कसमध्ये मात्र अशोक नामक चिंपांझी–किंवा कदाचित तो गोरिलाही असेल–(त्याचे पाळण्यातील नाव धर्मेंद्र आहे, असे ऐकतो.) तर हा चिंपांझी कधी माणसाच्या वेषात, तर कधी अस्वलाच्या रूपात कसरती सादर करतो आणि टाळ्या व शिट्टया मिळवतो. शिवाय मधून-अधून चाललेल्या चित्रपटाच्या कथेतही त्याला अत्यंत महत्त्वाची भूमिका मिळाल्याने तो नाक फुगविणे, दात विचकणे असे अत्यंत मूळावस्थेतील अभिनयप्रकारांचेही दर्शन घडवतो, कधी कधी झुल्यावरील सुंदरीबरोबर गाणीही म्हणतो. घोड्यावरील कसरती आणि मृत्युगोल हे या चिंपांझीचे हातखंडा प्रयोग आहेत. कित्येक ठिकाणी विदुषकांची कमतरताही तो भरून काढतो.

वैशिष्टय क्र ३–सीमा ऊर्फ हेमामालिनी या नावाची हरकामी झुलासुंदरी हे आणखी एक प्रेक्षणीय वैशिष्टय. ती जरी तलवारबाजीपासून मृत्युगोलापर्यंत सर्व खेळ करीत असली, तरी तिच्या कसरती पाहायला जाण्यापेक्षा तिला पाहायला जाणेच बहुतेक जण पसंत करतात. असे प्रेक्षणीय वैशिष्टय आपल्या सर्कशीत घेण्याची प्रोप्रारिमांची धंदेवाईक जाण मानायलाच हवी. शिवाय धर्मेंद्र–हेमा या बेरजेमागे बराच मोठा खरा-खोटा इतिहास असल्यानेही त्यांना एका सर्कशीत घेण्याचा फायदा प्रोप्रारिमांना मिळालाच. याशिवाय कसरतपटू सीमाला एक–दोन नाच देऊन तिच्या अंगातील नृत्यकलेचेही त्यांनी चीज (cheese) केले आहे.

वैशिष्टय क्र. ४–सर्कशीमधील वाद्यवृंदांची आघाडी राहुलदेव बर्मन यांनी सांभाळली आहे. शिवाय इतर सर्कशींमध्य नसलेली गीतांची सोय्ही आझाद सर्कशीत केली आहे. ही जबाबदारी आनंद बक्षींकडे सोपविली होती. त्यांनी चित्रपटाच्या कथेला रुचतील पण सर्कशीचे 'सर्कसपण' कुठेही हरवू देणार नाहीत, अशी 'टला ट, रीला री' गीते इमाने-इतबारे लिहून दिली आहेत.

वैशिष्टय क्र ५–प्रेम चोप्रा हा नामवंत विदूषक हे या सर्कशीचे खास आकर्षण ! त्याची सर्वांत मोलाची कामगिरी म्हणजे आपण विनोदी विदूषक आहोत, हे पक्के ध्यानात ठेवून तो सर्कशीत प्रेक्षकांना हसवितो. शिवाय मधून मधून चिंपांझी व सीमाच्या कसरतींमध्ये अडथळे आणून चित्रपटात खलनायकगिरीही करण्याचा प्रयत्न करतो. या सर्कशीतील अजित, ओम् शिवपुरी, केश्तो मुकर्जी, सुलोचना इत्यादी सर्कसपटू हे मूळचे अभिनेते. त्यांच्या अभिनयाबरोबरच त्यांचे सर्कशीच्या खेळांमधील प्रावीण्य प्रेक्षकांना दाखविणे, हेही या सर्कशीचे एक वैशिष्टय आहे त्याचप्रमाणे काही ठिकाणी घोडे, वाघ, सिंह, हत्ती इत्यादी प्राण्यांच्या अभिनयाचे दर्शन घडविणे हेही आझाद सर्कशीचे एक खास वैशिष्टय आहे.

वैशिष्टय क्र. ६–सर्कशीतूनही सामाजिक आशयाची जाण ठेवणे, दुष्ट शक्तीशी सामना देण्याचा संदेश देणे प्रोप्रारिमा विसरले नाहीत. त्यासाठीच त्यांनी जरठ-बालाविवाह, हिमखंडांतर्गत हशीश-आयात-निर्यात, कर्तव्यदक्ष सुरक्षाधिकारी-हत्या इत्यादी जुनेच प्रयोग आठवणीने सादर केले आहेत शिवाय उद्धट राजकुमारीचे प्रेमळ प्रेयसीत होणारे रूपांतर हे हृदयपरिवर्तनाच्या यशस्वी प्रयोगाचे व मनोविश्लेषणाचे एक मनोज्ञ उदाहरण आहे.

या व इतर अनेक वैशिष्टयांच्या जोडीला असणाऱ्या या कमतरता.

क्र. १–सर्कशीच्या वाद्यवृंदाने सादर केलेली 'कौन मिल गया घर से निकल के' आणि 'मैं हूँ तेरी प्रेम दिवानी' ही दोन गीते कानाला अत्यंत गोड व सुरेल वाटली. (कदाचित गायिका लता मंगेशकरांच्या आवाजाचा तो दोष असावा.) पण राहुल देवजींनी अन्य गाण्यांप्रमाणे थोडे मनावर घेतले असते तर हा गोडपणा व सुरेलपणा सहज टाळता आला असता.

कमतरता क्र. २–अजित बहुतेक सर्व वेळ सर्कशीपेक्षा चित्रपटाला आणि अर्थातच त्यामुळे आपल्या कसरतीपेक्षा अभिनयाला जास्त महत्त्व देत होता; त्यामुळे त्याचे काम चक्क चांगले होत होते. खलनायकाचा कोल्ह्यासारखा धूर्तपणा आणि लांडग्यासारखा हिंस्त्रपणा त्याच्या कामातून व्यक्त होत आहे हे प्रोप्रारिमांच्या लक्षात आले नाही का? त्यांनी वेळीच चाबूक कडकावून अजितला अभिनयाच्या या वाममार्गापासून वळवून बाकीच्यांप्रमाणे अंगमेहनतीच्या धोपटमार्गास लावायला हवे होते.

कमतरता क्र. ३–झुला सुंदऱ्यांची संख्या फारच कमी ठेवलेली होती. पुढील वेळी नीतू सिंग, बिंदू, परवीन बाबी, शीतल इत्यादी नावांचा विचार करावा.

कमतरता क्र. ४–आजपर्यंत न्यू जुगन सर्कस व न्यू बारूद सर्कसमधून प्रमोद चक्रवर्तींनी जे अफाट प्रयोग सादर केले आहेत (उदाहरणार्थ–मोटार दोन चाकांवर उचलून भरवेगाने चालविणे, आकाशामध्ये विमानांची शिवाशिवी इत्यादी), त्यांच्या तुलनेत न्यू आझाद सर्कशीतील प्रयोग नवीनपणा व चित्तथरारकपणा दोन्ही दृष्टींनी फार कमी पडले. कदाचित नवनवीन विदेशी चित्रपटांमध्येही हा कमतरता असल्यामुळे प्रोप्रारिमांचा नाइलाज झाला असावा.

कमतरता क्र. ५-नया जमाना आणि न्यू जुगनू सर्कसमधील सामाजिकता व राष्ट्रभक्तीच्या डोसाची तीव्रताही न्यू आझाद सर्कसमध्ये फार कमी झाली होती. पिळवणूक करणाऱ्यांच्या हातून पडणारे पिळवणूक होणाऱ्यांचे खून त्यासाठी वाढवावेत. प्रत्येक खुनामागे एकेक कसरतीचा प्रयोगही मिळेल.

आणखीही काही बारीक-सारीक कमतरता आहेत–उदाहरणार्थ, शोभा आनंद ही दुय्यम भूमिकेमधून अभिनेत्री होण्याकडे कलू लागली आहे; काही दृश्यांचे(विशेषतः घोडदौडीच्या) चित्रण छान झाले आहे; तर अशा कमतरता पुढे दूर करण्याकडे प्रोप्रारिमनी लक्ष दिल्यास त्यांच्या यापुढील न्यू अमुकतमुक सर्कशीलाही उज्ज्वल भवितव्य आहे. ☐

दीड वर्षापूर्वी घडलेल्या त्या करुण घटनेच्या संदर्भात बहुतेकांना भेटलो. फक्त एका अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीला भेटणं बाकी होतं; परंतु ते अशक्यच होतं. कारण ती व्यक्ती या जगातच नव्हती!

आणि तरीही हे कळणं आवश्यक की त्यानं आत्महत्या का केली?

हे समजून घ्यायला पहिल्यापासून सुरुवात करायची, तर –तो कसा होता?

तब्येतीनं चांगला. लहाणपणी व्यायाम करणारा. अलीकडे जरा सैल झालेला. या माणसासारखा का? नाही. त्याच्याहून उंच. अमक्याइतका रुंद; पण तसा बालिश नाही. साधारण त्या ह्याच्यासारखा; पण अधिक मर्दानी. आकार डोळ्यांसमोर पक्का झाला.

रूप–तुमच्याकडे त्याचा एखादा फोटो आहे का?

आमच्याकडे नाही–पण तिच्या माहेरी मिळेल.

त्याचा फोटो–आहे?

माहेरी फॅमिली आल्बम धुंडाळला जातो. त्यात बरेचसे फोटो तिच्या भावाचे. एकच फोटो फक्त त्या दोघांचा. बहुधा लग्नाच्या रिसेप्शनच्या वेळी काढलेला. लग्नातला सूट, शालू दोघांच्याही गळ्यात हार. तो काहीसा दाक्षिणात्य चित्रपटांच्या देखण्या नायकासारखा दिसणारा. ती त्याच्या मानानं किरकोळ वाटणारी.

आणखी एक फोटो आहे, त्याचा एकट्याचा. असं म्हणून भावानं आल्बम धुंडाळला. फोटोचं पान मिळालं; पण फोटो गायब!

माझ्या लक्षात आलं. म्हटलं राहू दे. तिनं काढून घेतला असेल.

भावानं खाली जाऊन तो तत्परतेने आणला. फोटो परत देताना तिला काय वाटलं असेल कोण जाणे. कदाचित तिनं तो अगदी सहजही दिला असेल.

फोटो परत आल्बममध्ये ठेवला गेला. तिला काय करायचाय तो आता? भाऊ म्हणाला, काही नको परत द्यायला. कसा दिसायचा याची कल्पना आली.

हा शर्ट मुळात त्याचाच. कपडे अतिशय फॅशनेबल घालायचा. कधी इस्त्री चुरगळलेली चालत नसे.

सिगरेट्सचं फार वेड. त्याहि फॉरिन मिळाल्या तर भलता खूष!

वेळाविषयी दक्ष. मिनिटामिनिटाचा हिशेब ठेवणारा.

इंग्लिश चित्रपटांची आवड.

वाचनं फार कमी. फिल्ममॅगझिन्स, मराठी मासिकं–काही तरी सटरफटर.

घुम्या. फारसा कुणाशी न बोलणारा.

घरच्या गोष्टी बाहेर कळू न देणारा.

पण त्यानं असं का करावं?

—ते काही सांगताच येत नाही! आजवर त्यानं कधीच कुठलाही अविचार केला नव्हता.

—मला विचाराल, तर तो अगदी कागदी वाघ निघाला!

—आम्ही त्याचे इतके जवळचे मित्र! पण आमच्याकडे कधीच काही बोलला नाही तो.

—नाही. मी त्याला लहानपणापासून ओळखतो; पण त्यानं आत्महत्या का करावी हे मला कळूच शकत नाही.

तुमच्याआमच्यातल्याच, पण केवळ एका कृतीनं क्षणात जगावेगळं ठरलेल्या एका अनोख्या व्यक्तिमत्त्वाचा शोध.

सत्यघटनेवर आधारित कादंबरी

# ‘जौळ’

रत्नाकर मतकरी

# माणूस दिवाळी अंक